संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा
रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २३.०९.२०२६ | अंक नं. १४९ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

उत्सव मजुरीचा, डबल फायद्याचा..
{₹999/- दागिन्यांच्या प्रतीग्रॅम मजुरीवर}
जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना तेवढी टक्के मजुरीत सूट
ऑफर 14 सप्टेंबर 2026 ते 8 ऑक्टोबर 2026 पर्यंतच वैध
उदा.
दागिन्यांचे वजन 1 ग्रॅम ते 10 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 10% लागणारी प्रतीग्रॅम मजुरी 899/-*
दागिन्यांचे वजन 50 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 50% लागणारी प्रतीग्रॅम मजुरी 499/-*
दागिन्यांचे वजन 100 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 100% मजुरीच नाही*
योजनेचे नियम : 1) सोन्याच्या प्रती एक दागिना व हजार स्टॉकवर लागू. 2) एका वेळेस एकाच योजनेचा लाभ घेता येईल.
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु

# चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगणारे जोशी महाराज



पत्रिका पाहून तर कोणीही भविष्य सांगू शकतो. परंतु, चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगणे ही एक मोठी विद्या आहे. आपले भविष्य कोणत्या क्षेत्रामध्ये कसे आहे, हेसुद्धा सांगितले जाते.

जसे कर्म तसे फळ, हे शाश्वत सत्य आहे. पण, बऱ्याचवेळा अहोरात्र प्रयत्न करूनही मोठे यश मिळत नाही, हा केवळ देवयोग मानणे, हा श्रद्धेचा भाग आहे. परंतु, भविष्यात काय घडणार आहे, हे तुमच्या वास्तू व चेहऱ्यावर लिहिलेले असते, असे प्रतिपादन बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील जोशी यांनी केले आहे. अनेक काळापासून चेहरा व वास्तू पाहून भविष्य सांगण्याचे ते कार्य करीत आहेत. जागा, जमीन, शेती, व्यवसाय, लग्न, संतती, वास्तुशास्त्राचे भाकीत ते त्या त्या घरातील कुटुंबप्रमुखाचा चेहरा पाहून करतात.

भविष्य सांगण्याचे अनेक प्रकार आहेत. पंचांगशास्त्राला आधार आहे. पण, चेहऱ्यावरून जे भविष्य सांगितले जाते, ते ज्योतिषशास्त्रावर अवलंबून असते. माणसाच्या चेहऱ्यापासून राग, आनंद, दोष आणि प्रेम, हे सर्व भाव कळतात, त्या अनुषंगाने भविष्य सांगतात.

जोशी हे चेहरा व वास्तू पाहून अचूक भविष्य वर्तविणाऱ्या भविष्यकारांपैकी एक आहेत. आत्तापर्यंत त्यांनी देशभरातील अनेक दिग्गज नेत्यांबाबत वर्तविलेले भविष्य खरे ठरले आहे. फिल्मलाइन, राजकीय, सामाजिक, मराठी-हिंदी अभिनेते, उद्योजक आणि बिझनेसमन, बिल्डर, रियल इस्टेट, शैक्षणिक क्षेत्रातील अनेकांचे भविष्य वर्तविले आहे. घर, ऑफिस, हॉस्पिटल, कारखाना, हॉटेल यांसारख्या जागा; मग मालकीच्या किंवा भाडेतत्वावर असल्या तरी भविष्य सांगतात व इ. दोष टाळण्यासाठी उपासनाही सांगतात, इतकेच नव्हे तर स्त्री-पुरुषांच्या सर्व समस्यांचे निवारण सांगतात. कोणत्याही प्रकारच्या कठीण वा अतिकठीण अडी-अडचणींवर मार्ग काढतात.

आत्तापर्यंत जोशी महाराजांनी वर्तविलेले भविष्य खरे ठरतेच, असा त्यांचा दावा आहे.

ता. आष्टी, जि. बीड । संपर्क : 9006239009, 9075174343

# नगर शहरातील मतदार याद्यांच्या 'मॅपिंग'मध्ये '४४ हजार विसंगती'

नगर – अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेअंतर्गत सर्व मतदारांचे मॅपिंग करुन दुबार नोंदणी असलेले, मयत किंवा स्थलांतरीत मतदारांची नावे वगळण्यात आली. मात्र, या मॅपिंगमधून प्रशासनासमोर नवीनच समस्या उभी राहिली आहे. शहरातील तब्बल ४४ हजार मतदारांच्या मॅपिंगमध्ये विसंगती असल्याचे समोर आले आहे. वयांमधील तफावत, नावांच्या स्पेलिंगमधील चुका आणि नावातील बदलांसारख्या विविध तांत्रिक कारणांमुळे हा गोंधळ निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

अहिल्यानगर शहराची एकूण मतदारसंख्या २ लाख ४६ हजार इतकी असून, या सर्व मतदारांची एसआयआर अंतर्गत नोंदणी व पडताळणी मोहीम राबविण्यात आली. या पडताळणीदरम्यान शहरातील जवळपास ४४ हजार मतदारांच्या नोंदीमध्ये विविध प्रकारच्या त्रुटी व विसंगती आढळून आल्या. या सर्व त्रुटींची दुरुस्ती करण्यासाठी प्रशासनाकडून आता युद्धपातळीवर हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

आढळून आलेल्या या विसंगती आणि त्रुटींची कायदेशीर व प्रत्यक्ष पूर्तता करण्यासाठी चांदणी चौकातील महासैनिक लॉन येथे विशेष सुनावणी मोहीम हाती घेण्यात येणार आहे. ही सुनावणी प्रक्रिया २६ सप्टेंबरपासून सुरु होऊन ३० ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे, अशी माहिती प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी दिली.

या प्रक्रियेत मतदारांच्या नावातील चुका, वयाचा मेळ नसणे किंवा इतर तांत्रिक बाबी तातडीने दुरुस्त करण्यासाठी प्रशासनाकडून विशेष अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे अंतिम मतदारयादी अधिक अचूक आणि सदोषरहित होण्यास मदत होणार आहे.

संबंधित ४४ हजार मतदारांच्या यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी प्रशासनाकडून बीएलओंमार्फत संबंधितांना नोटिसा बजावण्यात येत असून, २६ सप्टेंबरनंतर संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह शहरातील महासैनिक लॉन येथे अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### नोटिस बजावण्याची जबाबदारी बीएलओंची

मतदार यादी मॅपिंगमध्ये विसंगती आढळलेल्या मतदारांना विहित कागदपत्रे घेवून सुनावणीसाठी बोलावण्याची नोटिस बजावण्याची जबाबदारी बीएलओ यांच्यावर सोपविण्यात आली आहे. तसेच विसंगती आढळलेल्या मतदारांची नोंद सुसंगत करण्यासाठी संबंधित बीएलओ यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे, अशी माहितीही सांगण्यात आली.

### विशेष शिबिरांना अत्यल्प प्रतिसाद

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार एसआयआर मोहिमेत नवमतदार नोंदणीसाठी तसेच विद्यमान मतदारांच्या नोंदीमध्ये आवश्यक दुरुस्ती करण्यासाठी आणि नाव वगळण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर प्रत्येक मतदान केंद्रावर १९ व २० सप्टेंबर रोजी घेण्यात आले. मात्र, या शिबिरांना अत्यल्प प्रतिसाद मिळाल्याचे सांगण्यात आले. या विशेष शिबिरांसाठी बीएलओंची नियुक्ती करण्यात आलेली आहे. आता पुन्हा पुढील २६ व २७ सप्टेंबर रोजी देखील हे शिबिर घेण्यात येणार आहे.

पाऊल टाका स्टाईलमध्ये!
एकाच छताखाली हजारो स्टाईल्सची निवड!
पुरुष | महिला | मुलांसाठी
प्रत्येक प्रसंगासाठी योग्य, आरामदायी आणि ट्रेंडी फुटवेअर
एम.जी.रोड, कापड बाजार, अहिल्यानगर
आजच भेट द्या !
एकदा या.. पुन्हा याल!
SHOE PALACE शू पॅलेस सारडागल्ली, अ.नगर मो : 9881531536
फॅशन आणि मजबुतीचा पत्ता! Liberty SHOES
लिबर्टी शूज
एम. जी. रोड, कापड बाजार, अहिल्यानगर.

|| सातवे पुण्यस्मरण ||



स्व. पुष्पादेवी उध्दवदास गोपलानी
स्व. दि. २३/०९/२०१९
बिछड गये हो बीच राहो में, दिल से नही जा पाओगे।
आँखो में आसुं है गम के, आप जीवनभर याद आओगे।
आपके पावन स्मृतिमें भावपुर्ण श्रद्धांजली..
शोकाकूल
समस्त गोपलानी परिवार, अ.नगर
फर्म - सावन कलेक्शन
माणिक चौक, अहमदनगर. मो. 8007777719, 8007777716

# सरकारी नोकरी लावण्याच्या आमिषाने १२ लाख रुपयांहून अधिकची फसवणूक

## रक्षा मंत्रालयातील सेवानिवृत्तासह तीन जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

नगर – महसूल विभागात कनिष्ठ सहाय्यक पद व इतर नोकऱ्या मिळवून देण्याच्या नावाखाली बनावट आदेश तयार करून तब्बल १२ लाख २१ हजार ५०० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी भारत सरकारच्या रक्षा मंत्रालयातील सेवानिवृत्तासह तीन जणांवर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत नितीन बापुसाहेब पुंड (वय ३९, रा. तरवडी, ता. नेवासा) यांनी २२ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा फिर्याद दिली आहे. या फिर्यादीनुसार, नितीन पुंड यांचे नातेवाईक असलेले गोविंद विश्वनाथ दळवी (रा. नागरदेवळे, ता. नगर, सध्या रा. लोणावळा, पुणे) हे रक्षा मंत्रालयातून सेवानिवृत्त झालेले असून त्यांनी डिसेंबर २०१९ मध्ये फिर्यादी व त्यांच्या मित्रांना भूकंप पुनर्वसन कंत्राटी कर्मचारी समिती लातूरमार्फत महसूल विभागात नोकरी लावण्याचे आमिष दाखवले.

त्यासाठी सौ. सविता अमर आढाव व शाम विश्वंभर लोकरे यांच्या मदतीने मंत्रालयात कागदपत्रे जमा करण्यास सांगण्यात आले. आरोपींनी विविध कारणांसाठी व नोकरीच्या बहाण्याने फिर्यादीकडून डिसेंबर २०१९ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत आरटीजीएस, फोन पे, गुगल पे आणि रोख स्वरूपात वेळोवेळी १२ लाख २१ हजार ५०० रुपयांची रक्कम उकळली. तसेच संगनमताने सामान्य प्रशासन विभाग व राज्य शासनाचे बनावट स्वाक्षरीचे आणि बारकोड असलेले नियुक्तीचे व वेतनाचे खोटे आदेश व्हॉट्सपवर पाठवून फिर्यादीचा विश्वास संपादन केला.

जेव्हा फिर्यादीने हे आदेश संबंधित कार्यालयात दाखवले, तेव्हा ते बनावट व शासनाकडून निर्गमित न झाल्याचे समोर आले. फिर्यादीने दिलेले पैसे परत मागितले असता आरोपी गोविंद दळवी याचा मुलगा संतोष दळवी याने शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारानंतर आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादी नितीन पुंड यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी २२ सप्टेंबरला रात्री भिंगार पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली.

या प्रकरणी गोविंद विश्वनाथ दळवी, शाम विश्वंभर लोकरे आणि सौ. सविता अमर आढाव यांच्याविरुद्ध कॅम्प पोलीस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात करत आहेत.





गणेशोत्सवानिमित्त तोफखाना येथे सिद्धेश्वर तरुण मंडळ, जंगुभाई तालीम ट्रस्टच्या वतीने 'बाजीप्रभू, वीर शिवा काशीद व मावळ्यांच्या रक्ताने पावन झालेली पावनखिंड' हा जिवंत देखावा. (छायाचित्र – लहू दळवी)

15TH AUG HAPPY INDEPENDENCE DAY OFFER
Career Ki Shuruwat DiSHA ke saath
An ISO 9001:2015 Certified
DiSHA® COMPUTER INSTITUTE
Get Any Course Just in 2700/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY PRIME, ADV. TALLY, BANKING, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, HTML.
दिल्ली गेट शाखा — आनंद केशव हाइट्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर. 9371051769
जुने बस स्टँड शाखा — अंबर प्लाझा बिल्डिंग, माळीवाडा बस स्टँड शेजारी. अ.नगर. 9371151769
पाईपलाईन शाखा — रुचा गार्डन बिल्डिंग, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर 7447761769

# तरूणावर चाकूने प्राणघातक हल्ला

नगर – शहरातील तोफखाना परिसरातील जंगुभाई तालीम जवळ जुन्या वादातून एका तरुणाला मारहाण करून पोटात चाकूने वार केल्याची घटना २२ सप्टेंबर रोजी रात्री ९ च्या सुमारास घडली. याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत गणेश गुलाब बादाडे (वय २६, रा. रेशन दुकानाशेजारी, नागरदेवळे, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे मजूर असून ते २२ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास जंगुभाई तालीमजवळ आले होते. यादरम्यान आरोपी केदारी (पूर्ण पत्ता माहिती नाही, रा. बोल्हेगाव) आणि त्याचे इतर दोन अनोळखी मित्र तिथे आले.

कोणत्यातरी जुन्या कारणावरून आरोपींनी फिर्यादी गणेश यांच्याशी वाद घातला. अचानक त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. त्यानंतर आरोपी केदारी याने आपल्या जवळील धारदार चाकूने फिर्यादीच्या पोटात वार करून त्यांना गंभीर जखमी केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या फिर्यादीला तातडीने उपचारासाठी शहरातील 'साई एशियन हॉस्पिटल' येथे दाखल करण्यात आले असून तिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या हल्ल्याची माहिती मिळताच पोलिसांनी रुग्णालयात जाऊन फिर्यादीचा जबाब नोंदवून घेतला.

या जबाबाच्या आधारे तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# वादात मध्यस्थी करणाऱ्यावर हॉटेलमधील काटेरी चमच्याने हल्ला

नगर – शहरातील तोफखाना परिसरातील एका हॉटेलमध्ये जेवणासाठी गेलेल्या मित्रांमध्ये आपापसातील व्यवहारावरून वाद झाला. हा वाद सोडवण्यासाठी गेलेल्या मित्रावर एका तरुणाने काटेरी चमच्याने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना २० सप्टेंबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास यशश्री हॉटेलमध्ये घडली. फिर्यादी निल शरद कांबळे हे आपल्या मित्रांसोबत हॉटेलमध्ये जेवण करत होते. यादरम्यान आरोपी अक्षय आडेप आणि त्याच्या मित्रात व्यवहारावरून वाद सुरू झाला.

हे भांडण मिटवण्यासाठी निल कांबळे मध्यस्थी करण्यासाठी गेले. याचा राग आल्यामुळे आरोपी अक्षय आडेपने तू मध्ये पडू नको, आमचा व्यावहारिक वाद आहे, असे म्हणून टेबलावरील काटेरी चमचा उचलला आणि निल यांच्या उजव्या डोळ्यावर मारून त्यांना जखमी केले.

घटनेनंतर जखमी फिर्यादीने देशपांडे हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्यानंतर पोलिसांना जबाब दिला. या जबाबाच्या आधारे तोफखाना पोलिसांनी आरोपी अक्षय आडेप याच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या (भा.न्या.सं.) कलम ११८ (१) नुसार गुन्हा नोंदवला आहे.

# भिंगारमध्ये प्रथेप्रमाणे वामन जयंती दिनी गणेश विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ

## मानाच्या देशमुख गणपतीची पोलीस अधिक्षक सुदर्शन यांच्या हस्ते उत्थापन पूजा

नगर – भिंगार येथील गणेश विसर्जन मिरवणूकीस प्रथेप्रमाणे वामन जयंतीच्या दिवशी २३ सप्टेंबर रोजी दुपारी प्रारंभ झाला. पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते ब्राम्हणगल्लीतील मानाच्या देशमुख गणपतीची उत्थापन पूजा होऊन मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. पोलीस अधिक्षक सुदर्शन यांनी स्वत: मानाच्या गणपतीच्या पालखीला खांदा दिला.

ब्राम्हणगल्लीतील देशमुख गणपती हा भिंगारनाधील मानाचा गणपती आहे. या गणपती मंदिरात गणेश चतुर्थीला जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या हस्ते प्रतिस्थापना करण्यात आली होती तर प्रथेप्रमाणे उत्थापन पूजा २३ सप्टेंबर रोजी दुपारी पोलीस अधीक्षक सुदर्शन यांच्या हस्ते झाली. यावेळी शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टीपरसे, भिंगार कॅम्पच्या स.पो. नि. तेजस्वी थोरात यांच्या सह पोलीस अधिकारी उपस्थित होते. पोलीस अधिक्षक सुदर्शन यांचे सौ स्वाती देशमुख यांनी त्यांचे पारंपारिक पद्धतीने औक्षण करून स्वागत केले.





भिंगारमधील मानाच्या देशमुख गणपतीची उत्थापन पूजा करून गणेश विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ करताना पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन. समवेत देशमुख वाडा गणपतीचे विश्वस्त. (छायाचित्र – बबलू शेख)

त्यानंतर त्यांच्या हस्ते श्रीगणेशाची उत्थापन पूजा झाली पूजेचे पौरोहित्य प्रसाद कुलकर्णी यांनी केले. यावेळी देशमुख वाडा गणपतीचे विश्वस्त समीर देशमुख, कार्तिक देशमुख, प्रज्वल देशमुख, महेश कुलकर्णी हे उपस्थित होते. तसेच शिवाजी राऊत, अनिल भोसले, प्रशांत गुजर, राजश्री गुजर, गरिमा देशमुख, मनीषा देशमुख, जयश्री मुळे, पियुषा देशमुख, अनिल मुळे, मोरेश्वर मुळे, अमोल कोरे, रमेश तनपुरे, अमोल नागपूरे, कमलेश राऊत, ललित राऊत, राष्ट्रवादी भिंगार शहराध्यक्ष संजय सपकाळ आदी उपस्थित होते.

त्यानंतर श्री गणेशाची मिरवणूक पारंपरिक पध्दतीने फुलांनी सजविलेली पालखीमध्ये काढण्यात आली. या पालखीला पोलीस अधीक्षक सुदर्शन यांनी खांदा देत मिरवणुकीस प्रारंभ केला. मिरवणूक सनई चौघडा आणि रुद्रनाद ढोल पथकाच्या ढोल ताशांच्या गजरात दुपारी १.३० वाजता पारंपारिक पद्धतीने वाजत गाजत निघाली, मानाच्या गणपतीचे विसर्जन हे सुर्यास्ताच्या वेळी साधारण संध्याकाळी ६ वाजेपर्यंत होत असते. सायंकाळी विविध गणेश मंडळांकडून मिरवणुका काढण्यात येणार आहेत. या परिसरातील एकूण १२ सार्वजनिक गणेश मंडळांचा मिरवणुकीत सहभाग असणार आहे.

### ड्रोन, सीसीटीव्हीसह मोठा पोलीस बंदोबस्त तैनात

या मिरवणुकीसाठी मोठा बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे यांच्या नेतृत्वाखाली २ पोलीस उपअधीक्षक, २ पोलीस निरीक्षक, २५ सहाय्यक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक, २०० पोलीस अंमलदार, ३५ होमगार्ड, असा मोठा पोलीस बंदोबस्त मिरवणूक मार्गावर आणि शहरात ठिकठिकाणी तैनात करण्यात आला आहे. मिरवणूक मार्गावर व संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून संपूर्ण मिरवणुकीवर ड्रोन द्वारेही नजर ठेवली जात आहे.

### असा आहे विसर्जन मिरवणूक मार्ग

ब्राम्हण गल्ली येथून मानाच्या देशमुख गणपतीची मिरवणूक सुरु झाली असून ही मिरवणूक ब्राम्हण गल्लीतून भिंगार वेस, गवळीवाडा, भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन समोरून सदर बाजार, भिंगार अर्बन बँक, दाणे गल्ली, मोमीन गल्ली मार्गे अमरधाम जवळील गणेश विसर्जन विहीर अशी जाणार आहे. सायंकाळी सूर्यास्ताच्या वेळी मानाच्या गणपतीचे विसर्जन होणार आहे. दुपार नंतर सार्वजनिक गणेश मंडळे याच मार्गावर मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. यावर्षी मिरवणुकीत डीजेला प्रतिबंध घालण्यात आलेला आहे. केवळ २ बेस आणि २ टॉप यांनाच परवानगी असणार आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे. त्यामुळे मिरवणुकीत पारंपारिक वाद्यांचा गजर होतो की, डीजे चा दणदणाट हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### रेकॉर्डवरील गुन्हेगारांना २४ तास प्रवेश बंदी

गणेश विसर्जन मिरवणुकीच्या पोर्शभूीवर पोलिस प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार नगर विभागाचे प्रांताधिकारी सुधीर पाटील यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) प्रमाणे नगर शहराच्या भौगोलिक हद्दीमध्ये २३ सप्टेंबर रोजी पहाटे १२.०१ वाजेपासून मध्यरात्री १२ वाजेपर्यंत भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दीतील एकूण १६३ गुन्हेगारांना प्रवेशबंदी केल्याचे आदेश काढले आहेत. या आदेशाचा भंग करत दुपारी भिंगार शहरात फिरणाऱ्या तिघांना भिंगार कॅम्प पोलिसांच्या पथकाने पकडून त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. स.पो.नि. तेजस्वी थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने ही कारवाई केली.

## विश्वनाथ कोडम यांचे अल्प आजाराने निधन



नगर – श्रमिकनगर येथील रहिवासी विश्वनाथ गोपय्या कोडम (वय ८५) यांचे २३ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# जुन्या वादातून युवकाला लाकडी काठीने मारहाण

नगर – एमआयडीसी जवळील वडगाव गुप्ता येथील आंबेडकर चौक परिसरात एका युवकाला जुन्या वादातून लाकडी काठीने मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संदिप रावसाहेब चांदणे यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास वडगाव गुप्ता येथील आंबेडकर चौक परिसरातून आपल्या घरी जात असताना कैलास भाऊसाहेब ससाणे आणि रविंद्र भाऊसाहेब ससाणे यांनी संदिप यांना अडवून अरेरावी केली आणि शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

तसेच आरोपींनी संदिप यांच्या डोक्यात लाकडी काठीने प्रहार केला. दरम्यान, भांडण सोडवण्यासाठी आलेल्या त्यांच्या पत्नीलाही आरोपींनी धक्काबुक्की केली.

याशिवाय, पुन्हा आमच्या नादी लागला तर तुमचा गेम करू, अशी धमकी देत आरोपी घटनास्थळावरून निघून गेले. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नेप्ती नाका परिसरातून मोपेडची चोरी

नगर –शहरातील नेप्ती नाका चौक परिसरातुन होंडा कंपनीची पांढ्या रंगाची मोपेड (क्र. एमएच १६ ईबी ०२४२) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबत गौतम पोपट गायकवाड (वय ३८, रा. पाऊलबुद्धे शाळेसमोर, निर्मलनगर, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे पेंटिंगचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतात. त्यांनी ११ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास त्यांची मोपेड नेप्ती नाका चौक येथील पान टपरी शेजारी, वडाच्या झाडाखाली लॉक करून पार्क केली होती. ती मोपेड कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. त्यामुळे त्यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

## सुशिलाबाई पाठक यांचे अल्प आजाराने निधन



नगर – कुंभारगल्ली येथील रहिवासी श्रीमती सुशिलाबाई शरद पाठक (वय ८४) यांचे २२ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. संध्या, संदीप, संतोष यांच्या त्या मातोश्री होत.

## गणेश दराडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – बागडपट्टी येथील रहिवासी गणेश वसंत दराडे (वय ३८) यांचे २२ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, भाऊ असा परिवार आहे. अजय दराडे यांचे ते बंधू होत.

## भगवान काते यांचे हृदयविकाराने निधन



नगर – बारस्कर कॉलनी, लालटाकी येथील रहिवासी भगवान रघुनाथ काते (वय ५५) यांचे २२ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## शांतीलाल गांधी यांचे हृदयविकाराने निधन



नगर – सोनगाव कोल्हार, ता.राहुरी येथील शांतीलाल मोहनलाल गांधी (वय ८३) यांचे २३ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. लोणी प्रवरा हॉस्पिटल येथे त्यांचे देहदान करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, पत्नी, नातवंडे असा परिवार आहे. प्रमोद, सुभाष, नितीन गांधी यांचे ते वडील होत. सोनगाव येथील शितल क्लॉथ स्टोअर्सचे ते संचालक होत.

## इंदुबाई परभाणे यांचे दु:खद निधन



नगर – सिव्हिल हडको येथील रहिवासी श्रीमती इंदुबाई बाबुराव परभाणे (वय १००) यांचे २१ सप्टेंबर रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ४ मुले, सुना, १ मुलगी, नातवंडे, जावई असा परिवार आहे. विश्वनाथ, मनोहर, दत्तात्रय, बाळासाहेब परभाणे यांच्या त्या मातोश्री होत.

## केडगाव परिसरात वीज चोरी करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

नगर – केडगाव परिसरातील उदयनराजे नगर मध्ये महावितरणच्या भरारी पथकाने मोठी कारवाई करत वीज चोरीचा प्रकार उघडकीस आणला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा २००३ चे कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उदयनराजेनगर, केडगाव येथील प्लॅट क्र. ३०, मध्ये आरोपींनी त्यांचे घरगुती वीज उपकरणे चालवण्यासाठी जाणीवपूर्वक मीटरच्या मुळ रचनेत फेरफार करून मीटरमध्ये होणारी विजेची युनिट मोजमाप कमी व्हावी अशी व्यवस्था केली होती. याद्वारे १० जून २०२६ पूर्वीच्या १२ महिन्यांच्या कालावधीत एकूण २४४२ युनिट्सची, म्हणजेच एकूण ७ हजार ३२५ रुपये किमतीची वीज चोरी करण्यात आली असल्याचे समोर आले आहे. या वीज चोरीची रक्कम व दंड भरण्यास मुदत देवूनही संबंधितांनी बिलाचा व दंडाचा भरणा केला नाही.

त्यामुळे या प्रकरणी महावितरणच्या भरारी पथकाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता दीपक बाळकृष्ण घारे (वय ४३) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून फक्कड पाराजी वाळके आणि महेश फक्कड वाळके (दोघे रा. प्लॅट क्र. ३०, उदयनराजेनगर, केडगाव) या आरोपींविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस नाईक गोविंद गोल्हार करत आहेत.

# वनजमिनींचे ताबे कायम करा; पाणी उपसा आणि वीज चोरी थांबवा

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

नगर – नगर तालुक्यातील वाळूंज येथील वनजमिनीवर चार पिढ्यांपासून शेती करणाऱ्या व घरे करून वास्तव्यास असलेल्या शेतकऱ्यांना वनहक्क कायद्यानुसार जमिनीची मालकी देऊन त्यांचे ताबे कायम करावेत, तसेच पारनेर तालुक्यातील पळशी येथील खांबळी पाझर तलावासाठी संपादित केलेल्या १२ हेक्टर ९३ आर जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर महाराष्ट्र शासनाचे नाव नोंदवावे, या प्रमुख मागण्यांसाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमो २३ सप्टेंबर रोजी आंदोलन करण्यात आले.



नगर तालुक्यातील वाळूंज येथील वनजमिनीवर चार पिढ्यांपासून शेती करणाऱ्या व घरे करून वास्तव्यास असलेल्या शेतकऱ्यांना वनहक्क कायद्यानुसार जमिनीची मालकी देऊन त्यांचे ताबे कायम करावेत आदी प्रमुख मागण्यांसाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

यावेळी आंदोलकांनी खांबळी पाझर तलावातील कथित बेकायदेशीर पाणी उपसा आणि वीज चोरीवर कारवाई करण्याची मागणी केली. सरकारचे लक्ष वेधण्यासाठी ढोल–ताशे वाजवून तसेच फुगड्या खेळून आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी,ड. अमित थोरात, अशोक भोसले, पोपट भोसले, वीर बहादुर प्रजापती, शाहीर कान्हू सुंबे, बबलू खोसला, रंगनाथ कुलट, ममता विधाते, बाळासाहेब पालवे, हिरामन गायकवाड, शकुंतला बर्डे, मिना शिंदे, दत्ता केदारे, रेखा बर्डे, ज्ञानेश्वर गायकवाड, दगडू वाघ आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

वनहक्क कायदा २००६ अंतर्गत चार पिढ्यांपासून वनजमिनी कसणाऱ्या व त्यावर वास्तव्यास असलेल्या आदिवासी तसेच इतर पात्र शेतकऱ्यांना जमिनीचे हक्क देणे आवश्यक असल्याचे संघटनेने म्हटले. वनहक्काचे दावे करताना अनेक कुटुंबांकडे आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसतात. त्यामुळे केवळ पुरावे अपुरे असल्याच्या कारणावरून दावे फेटाळले जाऊ नयेत, अशी मागणी करण्यात आली.

नगर तालुक्यातील वाळूंज येथील सयाजी गायकवाड, आसाराम सातपुते, जगन्नाथ गुंजाळ, हिरामन गायकवाड, आसाराम बर्डे, मळू शिंदे, अशोक शिंदे, दगडू कदम, गोविंद सातपुते, विलास बर्डे, बारीकराव गायकवाड यांच्यासह इतर शेतकऱ्यांच्या वनजमिनींच्या हक्कांबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला. वाळूंजच्या कुरण परिसरात रस्ते, शाळा व इतर नागरी सुविधा उपलब्ध झाल्या असताना, अनेक वर्षांपासून तेथे वास्तव्यास असलेल्या कुटुंबांच्या जमिनींच्या हक्कांचा प्रश्न प्रलंबित राहणे अन्यायकारक असल्याचे आंदोलकांनी सांगितले. संबंधित वनजमिनींच्या ७ ई व ७/१२ई नोंदी कराव्यात तसेच पीक पाहणीमध्येही पात्र शेतकऱ्यांची नावे नोंदवावीत, अशी मागणी करण्यात आली. या मागण्यांसाठी ‘काळी आई मुक्ती आंदोलन’ व्यापक करण्याचा इशाराही देण्यात आला.

पळशी येथील खांबळी पाझर तलावासाठी १९८६ मध्ये १२ हेक्टर ९३ आर खासगी जमीन संपादित करण्यात आली. संबंधित जमीनमालकांना भूसंपादनाचा मोबदला देण्यात आला आणि १९९० पर्यंत तलावाचे काम पूर्ण झाल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे. मात्र, या जमिनींच्या सातबारा उताऱ्यावर अद्याप महाराष्ट्र शासनाचे नाव नोंदले गेले नसल्याचा आरोप करण्यात आला. या त्रुटीचा गैरफायदा घेऊन तलावातील पाण्याचा खासगी वापर केला जात असल्याचा दावा आंदोलकांनी केला. तलावावर बसविण्यात आलेले विद्युत पंप, आकडे टाकून होणारी कथित वीज चोरी आणि मोठ्या प्रमाणातील पाणी उपसा तातडीने थांबवावा, अशी मागणी करण्यात आली.

यंदा पावसाचे प्रमाण कमी असल्याने तलावातील उपलब्ध पाण्याचे संरक्षण करणे आवश्यक आहे. पळशी परिसरातील नागरिक तसेच पशुधनाला उन्हाळ्यापर्यंत पाणी उपलब्ध राहावे, यासाठी तलावातील पाण्याचे आरक्षण व संरक्षण करावे, अशी मागणी करण्यात आली. संबंधित बेकायदेशीर वीज जोडण्या व पाणी उपशावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली.

देशातील जातिव्यवस्था कमी करण्यासाठी आरक्षित व खुल्या प्रवर्गातील आंतरजातीय दाम्पत्यांच्या मुला–मुलींना शिक्षण आणि नोकरीतील आरक्षणाच्या निम्म्या जागांवर प्राधान्य देणारा कायदा करावा, अशी मागणीही आंदोलनातून करण्यात आली. आंतरजातीय विवाहांना संस्थात्मक प्रोत्साहन मिळाल्यास सामाजिक एकात्मतेला चालना मिळू शकते, असा संघटनेचा युक्तिवाद आहे. जातीय भेदभाव, स्त्रीदास्य आणि अंधश्रद्धा यांसारख्या सामाजिक प्रश्नांवर शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेकाच्या माध्यमातून काम करण्याची गरज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

जन्मठेप किंवा दहा वर्षांपर्यंतची शिक्षा झालेल्या कैद्यांसाठी केवळ शिक्षा भोगण्याची व्यवस्था न ठेवता त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडवून आणणारे शिक्षण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी संघटनेने केली. कारागृहांचे ‘धारणालय विद्यापीठ’ म्हणून रूपांतर करून कैद्यांना शिक्षण, कौशल्य आणि विचारपरिवर्तनाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, असा प्रस्ताव मांडण्यात आला. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात मानवी विचारप्रक्रियेतही सकारात्मक परिवर्तन घडविण्याची आवश्यकता असल्याचे आंदोलकांनी सांगितले.

ॲड. कारभारी गवळी यांनी आंदोलनाच्या विविध मागण्यांची भूमिका स्पष्ट केली. व्यवस्थेला प्रश्न विचारून सर्वसामान्यांचे प्रश्न मांडणारा व्यक्ती हाच खरा देशभक्त आहे. सरकारने वनजमीन धारक, पाणी संवर्धन आणि सामाजिक सुधारणांशी संबंधित मागण्यांवर तातडीने निर्णय घ्यावा. अन्यथा आंदोलन अधिक व्यापक करण्याचा इशारा पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदच्या वतीने देण्यात आला आहे.

### सामाजिक कार्यकर्त्यांना ‘लोकमान्य स्वराज्य सेनानी’ मानवंदना

पुणे येथील विद्यानंद बापट, संतोष पंडीत आणि मराठवाड्यातील अभिजित दीपके यांना त्यांच्या सामाजिक व राष्ट्रीय कार्याबद्दल ‘आत्मधारणालय लोकमान्य स्वराज्य सेनानी’ म्हणून मानवंदना देण्यात आली.

## मार्कस भांबळ यांचे हृदयविकाराने निधन



नगर – नगर–कल्याण रोडवरील विणकर सोसायटीतील रहिवासी व परी व्हेजिटेबल्स्चे संचालक मार्कस दिनकर भांबळ (वय ६५) यांचे २२ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी सिद्धार्थनगर येथील दफनभूमीत करण्यात आला.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# मीटरमध्ये फेरफार करून वीज चोरी करणाऱ्यावर कारवाई

नगर – केडगाव परिसरातील विठ्ठल मंदिर जवळ, लिंक रोड येथे महावितरणच्या भरारी पथकाने कारवाई करत वीज चोरीचा प्रकार उघडकीस आणला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा २००३ चे कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींनी त्यांचे घरगुती वीज उपकरणे चालवण्यासाठी जाणीवपूर्वक मीटरच्या मुळ रचनेत फेरफार करून मीटरमध्ये होणारी विजेची युनिट मोजमाप कमी व्हावी अशी व्यवस्था केली होती. याद्वारे ३० जून २०२६ पूर्वीच्या १२ महिन्यांच्या कालावधीत एकूण २४५३ युनिट्सची, म्हणजेच एकूण ६ हजार १२३ रुपये किमतीची वीज चोरी करण्यात आली असल्याचे समोर आले आहे. या वीज चोरीची रक्कम व दंड भरण्यास मुदत देवूनही संबंधितांनी बिलाचा व दंडाचा भरणा केला नाही.

त्यामुळे या प्रकरणी महावितरणच्या भरारी पथकाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता दीपक बाळकृष्ण घारे (वय ४३) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून माधवराव रघुनाथ कुलकर्णी आणि अजिंक्य माधव कुलकर्णी (दोघे रा. घर नं. ५४, विठ्ठल मंदिर जवळ, लिंक रोड, केडगाव) या आरोपींविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस नाईक गोविंद गोल्हार करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### उपवास करा पण...?

उपवास म्हणजे शरीराला विश्रांती देणे आणि मनाला शांत ठेवणे. अनेकजण उपवासाच्या दिवशी काहीच खात नाहीत आणि मग त्यांना अशक्तपणा येतो, डोके दुखते, त्यामुळे उपवासात योग्य आहार घेणे फार महत्वाचे असते. सकाळची सुरुवात ही नेहमी हलक्या आहाराने करावी. सकाळी उठल्यावर कोमट पाणी प्यावे आणि त्यानंतर खजूर किंवा केळी खावी. त्यानंतर साबुदाणा खिचडी ज्यामध्ये शेंगदाणे आणि बटाटा घातलेला असेल ती खाल्लयाने पोट भरलेले राहते आणि दिवसभर काम करण्यासाठी शक्ती मिळते. काही लोकांना साबुदाणा पचत नसेल तर त्यांनी वरीचे तांदूळ म्हणजेच भगर खावी. भगर ही पचायला अतिशय हलकी असते. दुपारच्या वेळी राजगिरा किंवा शिंगाड्याच्या पिठापासून बनवलेली भाकरी आणि त्यासोबत दही खावे. दही हे पोट थंड ठेवते आणि पचन सुधारते. तसेच शेंगदाण्याची आमटी देखील खाता येते. मधल्या वेळेत जेव्हा भूक लागेल तेव्हा फळे खावीत. सफरचंद, पपई, पेरू, द्राक्षे अशी कोणतीही फळे चालतात. फळांमुळे शरीराला जीवनसत्वे मिळतात. भाजलेले शेंगदाणे, मखाना किंवा थोडेसे सुके खोबरे आणि गूळ खाल्लयाने लगेच भूक भागते. उपवासात पाणी भरपूर प्यावे. नारळाचे पाणी, ताक, लिंबाचे सरबत हे पेय प्यायल्याने शरीरातील पाण्याची पातळी टिकून राहते आणि थकवा येत नाही. तेलात तळलेले पदार्थ, जास्त तिखट, जास्त मीठ असलेले पदार्थ टाळावेत कारण त्यामुळे पोटात जळजळ होते. संध्याकाळी उपवास सोडताना एकदम जड जेवण करू नये. आधी थोडे दूध किंवा फळ खावे आणि नंतर थोड्या वेळाने साधे जेवण करावे म्हणजे पचनाला त्रास होत नाही.

## गणेशोत्सव स्पेशल पाककला

### ओरिओ बिस्कीट मोदक

**साहित्य** : दहा ते बारा ओरिओ बिस्कीट, थंड दूध दोन ते तीन चमचे, वाटलेला नारळाचा कीस दोन मोठे चमचे, काजूची बारीक पूड एक चमचा, दुधाची साय किंवा घट्ट मलई एक चमचा, सजावटीसाठी थोडे पिस्त्याचे काप.

**कृती** : सर्वात आधी ओरिओ बिस्कीट उघडून मधले पांढरे क्रीम चमच्याने वेगळे काढून एका वाटीत ठेवा. आता राहिलेले काळे बिस्कीट मिक्सरच्या भांड्यात घालून त्याची एकदम बारीक पूड करून घ्या. ही पूड एका ताटात काढा. त्यात थोडे थोडे थंड दूध घालून हाताने मळून घ्या. जास्त दूध घालू नका नाहीतर मिश्रण पातळ होईल. घट्ट आणि मऊ गोळा तयार झाला पाहिजे. हा गोळा दहा मिनिटे झाकून ठेवा. आता दुसऱ्या वाटीत जे क्रीम आपण वेगळे काढले होते त्यात नारळाचा कीस, काजूची पूड आणि एक चमचा साय घालून चांगले एकजीव करून घ्या. हेच आपल्या मोदकाचे गोड सारण असणार आहे. आता मोदकाच्या साच्याच्या आत थोडे तूप किंवा तेलाचा हात लावा म्हणजे मोदक चिकटणार नाही. साच्याच्या दोन्ही बाजूला थोडे थोडे काळे बिस्किटाचे मिश्रण दाबून लावा आणि मधोमध थोडी पोकळी ठेवा. या पोकळीत तयार केलेले पांढरे सारण एक छोटा चमचा भरा. वरून पुन्हा काळ्या मिश्रणाने व्यवस्थित बंद करा. जास्तीचे मिश्रण काढून टाका. साचा अलगद उघडा म्हणजे सुंदर दोन रंगाचा मोदक तयार मिळेल. अशाच प्रकारे तयार झालेले सर्व मोदक एका ताटात ठेवून अर्धा तास फ्रीजमध्ये ठेवून द्या म्हणजे ते घट्ट होतील.वरून थोडे पिस्त्याचे काप लावून थंडच सर्व्ह करा.

## वास्तू

### दुकाना संबंधी...

दुकानाचे तोंड उत्तर किंवा पूर्व दिशेला असणे सर्वात शुभ मानले जाते. उत्तर दिशा ही कुबेराची म्हणजेच पैशाची दिशा मानली जाते आणि पूर्व दिशा ही सूर्याची दिशा आहे. या दोन दिशांना तोंड असलेल्या दुकानात उजेड जास्त राहतो, ग्राहकाला दुकान लांबून दिसते आणि आत येण्याची इच्छा होते. पश्चिम दिशेला तोंड असणे मध्यम मानले जाते.

## सौंदर्य

रोजच्या सौम्य मेकअपसाठी डोळ्यांसाठी फक्त काजळ आणि हलकीशी लाइनर पुरेशी असते.

## सल्ला

तेलाऐवजी चवीसाठी टोमॅटोची पेस्ट, दही, भाजलेल्या शेंगदाण्याचे कूट, तीळ किंवा खोबऱ्याचे वाटण वापरा. यामुळे भाजीला घट्टपणा आणि चव दोन्ही येते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २४ सप्टेंबर २०२६

**प्रदोष, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, धनिष्ठा १०।३५, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आज धनलाभ होण्याची शक्यता आहे.

**वृषभ** : कामात यश मिळेल. जुनी देणी वसूल होतील.

**मिथुन** : मनात अस्वस्थता राहील. प्रवासात अडचणी येतील.

**कर्क** : नवीन ओळखी होतील. मान सन्मान वाढेल.

**सिंह** : नोकरीत बढती मिळण्याचे योग आहेत. घरात पाहुणे येतील.

**कन्या** : खर्च जास्त होईल. तब्येतीकडे लक्ष द्यावे लागेल.

**तूळ** : व्यापारात फायदा होईल. जोडीदाराची साथ मिळेल.

**वृश्चिक** : वादविवाद टाळावेत. हातातील काम पूर्ण होईल.


**धनु** : भाग्याची साथ मिळेल. अडकलेले पैसे मिळतील.

**मकर** : शत्रूवर विजय मिळेल. दिवस उत्साहात जाईल.

**कुंभ** : रखडलेली कामे मार्गी लागतील. मुलांकडून आनंद मिळेल.

**मीन** : मानसिक तणाव जाणवेल. पैशांची आवक कमी राहील.

## शब्दगंध क्र. ७५२३ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द** :- १) सारख्या स्वभावाचा ५) एक सम संख्या; एक तपातील वर्षांची संख्या ६) नंतर; पुन्हा ७) आरोळी; मोठ्याने मारलेली हाक ८) गेलेला; मार्गस्थ झालेला ९) कोणत्या प्रकारचा; अरुंद तोंडाची लांबट पिशवी १०) मुस्लीम पुरुषाचे एक नाव १३) वडील; बाप; पिता १४) पळून जाण्यासाठी ठेवलेला रस्ता १७) एक औषधी वनस्पती १९) एक सम संख्या; वेदांची संख्या २०) झाडावर पिकलेले फळ २१) पदार्थाचा उडालेला तुकडा २२) वेतन; पेमेंट २३) वर्ष; टरफल; शके; सन; आवरण; कवच

**उभे शब्द** :- १) मानसिक वृत्तीची एकरूपता २) ठावठिकाणा ; तपास; ३) चांगल्या चारित्र्याचा ४) स्त्री; विलासिनी स्त्री ५) छोटा; लहान; लघू ८) विष्णुपत्नी; लक्ष्मी शोध ११) कितीही सांगितले तरी पुन्हा पुन्हा तीच चूक करणारा; निलाजरा १२) लीला; क्रीडा १४) एक लांबट फळभाजी १५) वाणी; जिव्हा; जीभ १६) आवरण; कवच; साल १८) भेग; तडा; भळ २०) अधर्म; पातक

### शब्दगंध क्र. ७५२२ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : रागाला जिंकायचं असेल तर मौन हे सर्वात मोठं शस्त्र आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### जर पाणी रंगहीन असते तर समुद्राला निळा रंग कसा येतो?

पाण्याला स्वतःचा रंग नसतो हे आपण रोज पाहतो. घरात आपण हंड्यात, तांब्यात किंवा बादलीत पाणी घेतो तेव्हा ते अगदी स्वच्छ दिसते. त्या पाण्यातून आपल्याला आरपार दिसते. मग हेच पाणी जेव्हा समुद्रात जाते तेव्हा त्याचा रंग निळा का होतो याचे कुतूहल लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सगळ्यांनाच असते. यामागे एक नाही तर अनेक कारणे आहेत आणि ती समजून घेतली की मनातील शंका दूर होते.सर्वात पहिले कारण म्हणजे सूर्याचा प्रकाश. सूर्यापासून येणारा प्रकाश वरून पांढरा दिसतो पण त्या प्रकाशात सात रंग लपलेले असतात. जसा प्रकाश समुद्राच्या पाण्यावर पडतो तसा पाण्याचा एक वेगळा गुणधर्म काम करू लागतो. पाणी हे लाल, नारंगी, पिवळा असे गरम रंग जास्त प्रमाणात स्वतःमध्ये ओढून घेते. पण निळा रंग मात्र ते ओढून घेत नाही. तो रंग पाण्याच्या आतून परत वर येतो आणि आपल्या डोळ्यांपर्यंत पोहोचतो. म्हणून आपल्याला संपूर्ण समुद्र निळा दिसतो. हीच गोष्ट जर तुम्ही थोड्या पाण्यात पाहिली तर जाणवत नाही कारण थोड्या पाण्यात रंग शोषण्याची क्रिया खूप कमी होते.दुसरे मोठे कारण म्हणजे आकाशाचे प्रतिबिंब.

समुद्र हा आकाराने इतका मोठा असतो की तो आकाशाचा आरसा बनतो. दिवसाच्या वेळी आकाश निळे असते आणि त्या निळ्या आकाशाची सावली समुद्राच्या पाण्यावर पडते. तुम्ही कधी पाहिले असेल की सकाळी सूर्य उगवताना समुद्र सोनेरी दिसतो आणि संध्याकाळी लालसर दिसतो. याचे कारण आकाशाचा रंग बदलतो तसा समुद्राचा रंग देखील बदलतो. जेव्हा आभाळ भरून येते तेव्हा समुद्र काळपट आणि राखाडी दिसतो. यावरून हे सिद्ध होते की समुद्राचा रंग हा आकाशाच्या रंगावर खूप अवलंबून असतो.

तिसरे कारण म्हणजे समुद्राची खोली आणि अफाटपणा. एका ग्लासातले पाणी आणि समुद्रातले पाणी यात जमीन अस्मानाचा फरक आहे. ग्लासातले पाणी थोडे असते म्हणून त्यातून प्रकाश आरपार जातो. पण समुद्रात हजारो हात खोल पाणी असते. इतक्या मोठ्या पाण्याच्या साठ्यात प्रकाश खोलवर जातो आणि परत येताना त्याचा निळा रंग अधिक गडद होत जातो. म्हणूनच किनाऱ्यावर जिथे पाणी गुडघाभर असते तिथे पाणी पांढरे किंवा थोडे हिरवट दिसते पण जसजसे आपण खोल समुद्रात जातो तसतसा रंग अधिक गडद निळा होत जातो.काही वेळा समुद्र हिरवा, तपकिरी किंवा काळाही दिसतो. याचे कारण समुद्रात राहणारे जीव आहेत.

समुद्राच्या पाण्यात असंख्य छोट्या वनस्पती, शेवाळ आणि धूलिकण तरंगत असतात. जेव्हा या वनस्पती जास्त वाढतात तेव्हा पाणी हिरवे दिसू लागते. जिथे वाळू जास्त असते तिथे पाणी थोडे तपकिरी दिसते. याचा अर्थ पाणी आपला रंग आजूबाजूच्या गोष्टींमधून घेते. थोडक्यात सांगायचे झाले तर पाण्याला स्वतःचा रंग नाही पण सूर्यप्रकाश, आकाशाचे प्रतिबिंब, पाण्याची खोली आणि पाण्यातील जीव या चार गोष्टी एकत्र आल्या की आपल्याला समुद्र सुंदर निळा दिसतो.

## खरी कला

एकदा एका गावात दोन चित्रकार राहत होते. दोघेही खूप हुशार होते. एक चित्रकार होता राघव आणि दुसरा होता माधव. राघव खूप श्रीमंत घरातला होता. त्याच्याकडे महागडी रंग, मोठे मोठे कुंचले आणि सुंदर कागद होते. तो रोज म्हणायचा माझ्याकडे सगळ्या वस्तू आहेत म्हणून माझी कला सगळ्यात भारी आहे.

माधव मात्र गरीब होता. त्याच्याकडे फक्त कोळशाचा तुकडा आणि जुन्या भिंती होत्या. तो त्या कोळशाने भिंतीवर चित्र काढत असे. लोक त्याच्या चित्रांकडे लक्षही देत नसत.एकदा राजाने गावात स्पर्धा ठेवली.

राजा म्हणाला जो कोणी माझ्या मनातले दुःख चित्रात दाखवेल त्याला बक्षीस मिळेल.राघवने लगेच महागड्या रंगाने राजाचा सुंदर राजवाडा आणि सोन्याचा मुकुट काढला. चित्र खूप चमकदार होते पण त्यात भावना नव्हती.

माधवने मात्र राजवाड्याच्या बाहेर बसलेल्या एका भुकेल्या म्हाताऱ्याचे चित्र काढले. त्या म्हाताऱ्याच्या डोळ्यात भूक आणि एकटेपणा होता. ते चित्र त्याने फक्त कोळशाने काढले होते पण ते पाहून राजाच्या डोळ्यात पाणी आले.राजा म्हणाला माझ्या राजवाड्यात सोने आहे पण माझ्या राज्यात लोक उपाशी आहेत हेच माझे खरे दुःख आहे आणि हे दुःख या गरीब चित्रकाराने ओळखले. राजाने बक्षीस माधवला दिले.

तात्पर्य : कला ही साधनात नसते ती साधनेत असते. महागड्या वस्तू असून उपयोग नाही जर मनात भावना नसेल. गरीबीतही जर मनात खरी तळमळ असेल तर साध्या कोळशानेही महान कलाकृती घडू शकते.

## आत्मशक्ति



### परमेश्वराची लेकरे

चेहऱ्यावर राग दिसून येतो. शरीराचे हावभाव किंवा आवाजाच्या चढउतारांवरून राग स्पष्ट होतो. आम्ही जरी ह्या गोष्टी टाळल्या तरी क्रोधाचे अंगार अंतरी फुलत राहतातच. त्याची जाणीव इतरांना होतेच. आम्हाला वाटते की आमचे विचार दुसऱ्यावर परिणाम घडवीत नाहीत. परंतु ते परिणाम घडवितातच आणि त्यामुळे आमचा आत्मा मलिन होत जातो. त्यामुळे जे आमच्या जवळचे असतात त्यांनाही त्रास होतो. शेवटी समोरच्या माणसाला एवढे कष्ट होत नाही जेवढे क्रोध करणाऱ्या माणसास कष्ट होतात. बुमरँगप्रमाणे तो क्रोध करणाऱ्यावर उलटतो व त्याचे नुकसान करतो. निसर्गाच्या ह्या श्रेष्ठ नियमाला आपण टाळू शकत नाही. क्रोध हा संतापाच्या शब्दांनीही व्यक्त होतो. आम्ही एखाद्याला बऱ्यावाईट शब्दांनी दुखवू शकतो. दुसऱ्यांची खोटी निंदा करु शकतो व त्याच्या पाठीमागे बऱ्यावाईट गोष्टी करू शकतो.

शारीरिक इजा करणे म्हणजेच हिंसा करणे असे आम्ही समजतो. परंतु हा गैरसमज आहे. पुष्कळदा तलवारीच्या जखमापेक्षा शब्दांच्या जखमा अगदी खोलवर जातात. शारीरिक जखमा बऱ्या होतात. पण शब्दांच्या जखमा आयुष्यभर दुखवीत असतात. काही तीव्र शब्दांनी आपले हृदय घायाळ केले असेल तर ते विसरणे शक्य होत नाही. एक म्हण आहे, प्रथम विचार करा, मगच बोला! महात्मा गांधींचा आदेश होता, जे सत्य आहे, गोड आहे आणि आवश्यक आहे, तेच बोला.

ह्यावरुन आम्हाला शिकले पाहिजे की, काहीही बोलण्यापूर्वी विचार करा वा

म्हणजे आपल्या शब्दांनी कोणालाही दुःख पोहोचणार नाही. क्रोध शारीरिक हिंसेचेही रुप घेतो. अशी ही हिंसा दोन माणसांत होते अथवा हा क्रोध अधिक मोठ्या प्रमाणावर पोहोचतो तेव्हा दोन समाजात वा दोन धर्मियांत युध्द होते. हिंसा कशासाठी ? दोन्हीही धर्म परमेश्वरावर विश्वास ठेवतात, फरक एवढाच की परमेश्वराला वेगवेगळ्या नावाने ओळखतात. वेगवेगळ्या पध्दतीने पूजा अर्चा वा आराधना करतात! सर्वजण परमेश्वराची लेकरे आहेत. तरीसुद्धा रागात येऊन परमेश्वराच्या नावावर मारामारीला तयार होतात. जर आम्ही आमच्या धर्माला मानतो तर धर्मसंस्थापकांची मते पाळली पाहिजेत.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### तुलना

आत्म्याचे आपल्यापेक्षा वेगळे असणारे गुण आपण स्वीकारतो तर त्याचे कमकुवत संस्कार दिसताच आपण त्याची तुलना इतरांशी का करतो ? आपल्याला त्याचे संस्कार त्याच रूपात स्वीकारायला हवेत ज्या रूपात ते भूतकाळातून (गतजन्मातून) समोर आले आहेत. आईवडिलांनी त्या आत्म्यावर इतकं प्रेम करायला हवं की त्याचा भीतीचा पूर्वसंस्कार बरा होईल, पुसला जाईल, तो त्यातून बाहेर पडेल. त्या आत्म्याची तुलना इतरांबरोबर न करता ते त्याचा बचाव करू शकतात. जेव्हा आपण दोन आत्म्यांची तुलना करतो तेव्हा ते दोन आत्मे वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आले आहेत हे आपण विसरतो. समजा, मागच्या जन्मात, एक आत्मा शहरात राहिलेला असेल आणि दुसरा एखाद्या छोट्या गावात.

अशा वेळी त्या दोन्ही आत्म्यांच्या संगोपनात, संस्कृतीत आणि व्यक्तिमत्वात प्रचंड तफावत असणार. त्यांच्या वर्तमान जन्मात जर ते एकाच कुटुंबात जन्मले तर सख्खे भाऊ असूनही ते दोघे इतके वेगळे कसे या बाबत आपल्याला आश्चर्य वाटेल.

आपल्याला दोन भावंडांत कोणतीही तुलना न करता त्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन द्यायचं आहे. नाही तर, तुलना हा संस्कार त्यांच्यात एवढा रुजेल की मोठेपणीही ते इतरांशी तुलना आणि स्पर्धा करत राहतील.

सुरेश ओबेरॉय : मी असं बघितलंय की, जर बहीणभावांमध्ये सतत तुलना केली तर त्यांच्या मनात एकमेकांबद्दल द्वेष निर्माण होतो.

शिवानीदीदी : संपूर्ण कुटुंबाच्या केंद्रस्थानी पहिलं मूल असतं. जेव्हा ते थोडं मोठं होतं आणि घरात दुसरं बाळ जन्माला येतं तेव्हा, जर घरात कोणी त्याला काहीच समजावून सांगितलं नाही तर त्या परिस्थितीचा स्वीकार करणं पहिल्या मुलाला अवघड जातं. त्याला फक्त एकच गोष्ट समजू शकते ती म्हणजे इतके दिवस फक्त त्याच्यासाठीच असलेलं पालकांचं प्रेम आणि लक्ष आता विभागलं जाणार आहे. त्यामुळे सुरुवातीला, त्याची समज तयार होईपर्यंत कदाचित त्याला नवीन

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गावात वीज येणार असल्यामुळे सगळे लोक नाचत होते
त्यात एक कुत्रा हि नाचत होता.
लोकांनी विचारले तू का खुश आहेस? त्यावर कुत्रा म्हणाला,
वीज येईल तर खांब पण लागतील ना !!!!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ दुधापासून दही बनणे ही कोणती क्रिया आहे?

– रासायनिक

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### संतती प्रतिबंधक उपाय

एखाद्या वेळेस चुकल्यास दुसऱ्या दिवशी सकाळी एक व रात्री एक अशा दोन गोळ्या घ्याव्यात. नवविवाहितांसाठी हे सर्वात सोपे असे साधन आहे. अगदी कमी मात्रेत हार्मोन्सचा डोस असलेल्या गोळ्या बाजारामध्ये उपलब्ध आहेत. फक्त आपल्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखालीच त्या सुरू कराव्यात.

काहींना गोळ्या सुरू केल्यानंतर चक्कर येणे, मळमळ अशा स्वरूपाचा त्रास होऊ शकतो. सुरुवातीला प्रथमतः रोज कपभर दूध प्यावे व नंतर गोळी घ्यावी म्हणजे त्रास कमी होईल. गर्भनिरोधक गोळ्या ह्या जास्तीत जास्त सहा महिने खाव्यात. मध्ये एक महिना गोळ्या बंद करून पुन्हा सुरू केल्या तरी चालतात.

२) नैसर्गिक संततिप्रतिबंधक उपाय :


साधारणत :

पाळीच्या १० व्या दिवसापासून ते २० व्या दिवसापर्यंत गर्भधारणा होत असते; त्यामुळे या काळात संबंध होऊ देऊ नये. पाळीच्या पाचव्या दिवसापासून पुढे चार दिवस संबंध आला तर चालते. (९ दिवसापर्यंत) मधला १०-२० दिवसापर्यंतचा काळ गर्भधारणा होण्यासाठी उपयुक्त असल्यामुळे या काळात संबंध होऊ देऊ नये. २१ व्या दिवसापासून पुढे पाळी येईपर्यंत जरी शारीरिक संबंध झाले, तरी गर्भधारणा होत नाही; परंतु ही उपाययोजना ज्याची पाळी अगदी नियमित आहे अशांमध्येच उपयोगात येऊ शकते. अनियमित पाळी असणाऱ्यांमध्ये अनियमित किंवा कधीही बीजनिर्मिती होऊ शकते व गर्भधारणा होऊ शकते; म्हणून ही पद्धत जास्त प्रमाणात अवलंबली किंवा वापरली जात नाही.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# स्कॉटलंड येथे भारतीय संस्कृतीप्रमाणे गणेश विसर्जन









नगर – स्कॉटलंड युके मध्ये एडनबर्ग येथील कॉलेजमध्ये गणेश विसर्जन कार्यक्रम २० सप्टेंबर रोजी भारतीय संस्कृती प्रमाणेच झाला. आपल्या भारतातून स्कॉटलंड येथे वास्तव्यास असलेल्या भारतीय कुटुंबातील मुला-मुलींनी व तेथील काही नागरिकांनी हा गणेशोत्सव उत्साहात साजरा केला. गणेश विसर्जन मिरवणूक व गणपती सासवड पुणे येथून गेलेले वासुदेव तांबोळी व सौ वंदना तांबोळी यांनी प्रत्यक्षदर्शी अनुभवला. त्यामुळे मोबाईल कॅमेरा सर्व उत्सव टिपण्याचा मोह त्यांना आवरता आला नाही. मुलं-मुली व उत्सवात सामील झालेले नागरिक भारतीय केशरी फेटा पोशाखात होते. मुली नऊवारी साड्या केशरी फेटा वगैरे शृंगार केलेल्या तर पुरुष मंडळी केशरी कुर्ता व पांढरी सलवार केशरी फेटा या पेहरावात होत्या. ढोल-ताशा, लेझीम वाजवत होते. काहींच्या हातात भगवे ध्वज उंच उंच फडकवत असताना दिसत होते.

अर्थात हे सर्व एका सुंदर अशा पालखीत विराजमान व सजवलेल्या गणेश मूर्ती पुढील हे दृश्य दिसत होते. अलटून पालटून या गणेशाची पालखीसाठी पोशाखातील चार ते सहा जण आपल्या खांद्यावर घेऊन वरातीसारखे पुढे पुढे जात होते. यावेळेस विसर्जन मिरवणुकीत एकसारखे पोशाख केलेले शाळकरी मुलं मुली देखील झांज पथकात सामील झाली होती. सर्व विसर्जन मिरवणूक अत्यंत उत्साहात ढोल ताशा झांज लेझीम पथकात शिस्तबद्धरितीने चाललेली दिसली. भारतीय परंपरेप्रमाणे वाद्य उमेशभूषा असलेले हे सर्व मुले मुली नागरिक उत्साहाने मिरवणूक रस्त्याने काढून शांततेत गणेश विसर्जन समुद्रकाठी करत होते हे कौतुकास्पदच म्हणावे लागेल. गणपती विसर्जन मिरवणूकीच्या कॉलेजमधून निघाली त्या एडनबर्ग येथील कॉलेजच्या हॉलमध्ये वेगवेगळे स्टॉल लावलेले दिसले. तेथे भारतीय वस्तू व खाद्यपदार्थ विक्रीसाठी ठेवलेले होते. भारतीय लोक याची खरेदी करताना दिसत होते. एकंदरीतच तेथील सर्व वातावरण पाहून आपण जणू भारतातच असल्याचा भास होत होता.







सिव्हील हडको येथील सौ. भाग्यश्री वेदकुमार कुलकर्णी यांनी केलेली गौरी गणपतींची स्थापना व शेजारील छायाचित्रात दिंडीतील वारकरी व विष्णूंच्या दशावतारांची करण्यात आलेली छोटेखानी आरास.

# प्रेरणादायी अक्षरधन

## चातुर्याला शहाणपण जोडावे







बुद्धीचे कौशल्य वापरून सर्वांचे भले करावे, तेव्हाच चतूर म्हणवावे.

ज्यामुळे सत्कार्य घडते तेच चातुर्य. तो नर चतुर, जो अडलेल्यांचे कार्य करतो सुकर. चातुर्य लक्षणं नार्यः । चातुर्य हे स्त्रियांचे लक्षण. त्या आपल्या बुद्धिकौशल्याने कुटुंबाचे करिती पोषण. हाच चातुर्याचा अर्थ, की त्यामुळे साधतो परमार्थ.

पण आज चातुर्यामुळे लोक साधतात फक्त स्वार्थ. चातुर्यात असावी खरे तर इतरांची भलाई: पण आज त्याच चातुर्यामुळे होते इतरांची बुराई.

लोक ज्योतिषी माणसाला हात दाखवतात. ज्योतिषी, तू दीर्घायू आहेस. म्हणून ठोकून देतात. तो खरंच जगला, तर भरपूर धन देतो ज्योतिषाला. प्रशस्तिपत्रांची खैरात करून खूप कीर्ती मिळवून देतो त्याला. पण समजा लगेच मरण पावला तर ? ज्योतिषी कुठे नडला ? ज्योतिषाला खोटारडा म्हणायला तो जिवंतच कुठं राहिला? मग ज्योतिषाच्या बनवाबनवीला उघड पाडायला कोण उरला ? चतुराईमुळे ज्योतिषाला व्हायचा तो धनलाभ होऊन गेला.

आयुर्वेदाचे ज्ञान यथातथाच. औषधोपचार मनाला येईल तसाच. फक्त चतुराई करायची. रोग्याला कठीणात कठीण पथ्ये पाळायला लावायची. पथ्ये पाळली तर वैद्याच्या पथ्यावरच पडली. रोगी जगला तर वैद्यामुळे गुण आला.

रोगी मेला तर कुपथ्यावर दोष गेला. वैद्य सहिसलामत सुटला.

पण चातुर्य असे नसावे. चातुर्याला शहाणपण जोडावे, सर्वांचे भले करण्यासाठी चातुर्य वापरावे. म्हणूनच ज्ञानेश्वर माउली म्हणतात. येथ चातुर्य शिहाणे झाले ।

कारण गीतेतील ज्ञानामुळे लोकांचे भले झाले. पांडुरंगाला वश करून घेण्यासाठी संतांनी ज्या भक्तिभावाने अभंग रचले, तो भक्तिभाव नम्रतेचा आहे. तसाच चातुर्याने विनटलेला आहे. संत चोखामेळा यांची बहीण निर्मळाबाई पांडुरंगाला प्रश्न करते.

का बा पंढरीराया मोकलिले मज। नाठवेचि मज दुजे काही । चोखियासी सुख विश्रांती दिधली । माझी सांड केली दिसतसे ।। निर्मला म्हणे तुम्ही तो सुजाण । माझा भाग शीण कोण वारी ? ।

पंढरीनाथा, तू मला का वाळीत टाकलेस? तुझ्याशिवाय इतर कुणाचीही मला कधी आठवणही होत नाही. पांडुरंगा, चोखोबाला तू भेटलास. त्याला दर्शनसुख दिलेस. भावाशी एक भाव आणि त्या भावाच्याच बहिणीशी मात्र दुजाभाव ? माझी हेळसांड करतोस? तू स्वतः सुजाण म्हणवतोस. मग तुझ्याशिवाय माझा थकवा, माझा शीण दुसरा कोणी घालवू शकणार नाही हे तुला समजत नाही, असे कसे म्हणू? आपल्या बुद्धिनुसार भगवंताला कोंडीत पकडण्याचे सात्त्विक चातुर्य निर्मळेने वापरले.

मोरोपंतांनी तर संपूर्ण केकावलीच अशी चातुर्याने टाहो फोडीत आर्त भावनेने रचिली आहे. परमेश्वरा, तू पतितपावन आहेस. मग तस्त्राचि उरलो कसा ? पतित मी नको काय की?

माझा अजून उद्धार झाला नाही. याचे काय कारण असावे ? मी पतित असेन तर तू पतितपावन म्हणून माझा उद्धार केलाच असतास. मग मी पतित नसेन, म्हणजे पुण्यवान असेन. मग तर यापूर्वीच माझा उद्धार व्हायला हवा होता. परमेश्वरा कुठं तरी गोंधळ झालेला दिसतोय. सावर तो.

**– किशोर गांधी**

# 'आजची अहिल्या' देखाव्यातून धर्म व संस्काराची जाणीव करून देत महिला शक्तीकरणाचा अनोखा संदेश

## गणेशोत्सवात श्री महावीर प्रतिष्ठान ट्रस्टचा सामाजिक देखावा



'आजची अहिल्या' या देखाव्याचे उद्घाटन करताना उद्योजक नरेंद्र फिरोदिया व आ.संग्राम जगताप.

नगर – धर्म, संस्कार, इतिहास विसरत चाललेल्या आजच्या तरुण पिढीला यांची जाणीव करून देत डोळ्यात अंजन घालणारा 'आजची अहिल्या' हा प्रबोधनात्मक देखावा माणिक चौकातील श्री महावीर प्रतिष्ठान ट्रस्टने साकारला आहे. या देखाव्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी लव्ह जिहादच्या पिडीत तरुणीला हिंदू धर्म, संस्कारांची जाणीव करून देत संकटावर मात करण्याची कशी प्रेरणा देतात हे दाखवून महिला शक्तीकरणाची जनजागृती केली आहे. संपूर्ण एआय तंत्रज्ञानाचा वापर करून साकारलेल्या या देखाव्यात स्क्रीनवर ११ मिनिटाचा नाट्यमय व्हिडीओ व पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा संदेश दाखवण्यात आला आहे.

या देखाव्याचे उद्घाटन आ.संग्राम जगताप व उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले.

यावेळी शहर भाजपचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, राजेश भंडारी, डॉ.प्रकाश कांकरिया, डॉ.सुधा कांकरिया, बाबुशेठ बोरा, नगरसेवक महेश लोंढे, दैनिक नवा मराठाचे संपादक ललित गुंदेचा, संतोष गांधी, कमलेश भंडारी, निखिल लुने, सिद्धार्थ गांधी, रोहन गांधी यांच्यासह श्री महावीर प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष हर्षल बोरा, उपाध्यक्ष राकेश भंडारी, सेक्रेटरी अक्षय मुनोत, कोषाध्यक्ष आशीष चोपड़ा सर्व पदाधिकारी, सभासद व नागरिक उपस्थित होते.

यावेळी प्रतिष्ठानचे सदस्य स्वप्निल मुनोत, अमित फ़िरोदिया, चेतन भंडारी, श्रीपाल शिंगी, सचिन लुनिया, प्रसाद बोरा, निखिल गांधी, रोहित भंडारी, नीरज गांधी, रोहित गांधी, सुजित कटारिया, आशीष गुंदेचा, नीतीश कटारिया, विशाल ताथेड़, आनंद गांधी, सी.ए. दर्शन चाणोदिया, आनंद मुनोत, प्रसना भंडारी, रितेश पारख, सोमनाथ मुळे, सुमित वाघ, गौरव कांकरिया, गौरव पोखरना, कुशल भंडारी, रोहित गांधी, सत्यम लुणिया, चेतन गुंदेचा, निखिल गांधी, रवि गांधी, रूपेश पटवा, परेश बोगावत, गगन शिंदे आदी उपस्थित होते.

# भूमीपुत्र ते नवग्रहातील 'मंगल'! अंगारकाची घोर तपश्चर्या आणि 'अंगारकी चतुर्थी'चे मूळ रहस्य



ज्याचे नाव ऐकताच प्रत्येक गणेशभक्ताचे अंतःकरण श्रद्धेने भारून जाते – 'अंगारकी चतुर्थी'!

वर्षभरात अनेक संकष्टी किंवा विनायक चतुर्थी येतात; परंतु जेव्हा मंगळवारी चतुर्थीचा योग जुळून येतो, तेव्हा तिला 'अंगारकी' म्हटले जाते आणि त्या एकाच दिवसाच्या व्रताने संपूर्ण वर्षाच्या व्रताचे पुण्य प्राप्त होते अशी दृढ श्रद्धा आहे.

परंतु या तिथीला 'अंगारक' हे नाव कसे मिळाले? लाल रंगाचा धगधगता 'मंगल ग्रह' आणि विघ्नहर्ता श्रीगणेश यांच्यातील अलौकिक नाते काय आहे? 'श्रीगणेश पुराण' (उपासना खंड) मध्ये नोंदवलेली ही रसाळ, चित्तवेधक आणि खगोल-अध्यात्माचा संगम घडवणारी ही कथा.

फार प्राचीन काळी अवंती नगरीत (आजचे उज्जैन) भारद्वाज नावाचे अत्यंत ज्ञानी, वेदसंपन्न आणि तपोनिष्ठ महर्षी निवास करत होते. ते नियमितपणे अग्निहोत्र, स्वाध्याय आणि तपश्चर्येत लीन असत.

एके दिवशी महर्षी भारद्वाज पवित्र क्षिप्रा नदीवर मध्यान्ह स्नानासाठी गेले असता, तिथे जलामध्ये जलक्रीडा करणाऱ्या एका अलौकिक रूपसंपन्न अप्सरेचे त्यांना दर्शन झाले.

त्या क्षणी प्रकृतीच्या प्रभावामुळे महर्षींच्या चित्तात एका सूक्ष्म कामतरंगाचा उदय झाला आणि त्यांच्याकडून वीर्यस्खलन झाले. ते तेजःपुंज वीर्य क्षिप्रा नदीच्या काठावरील पवित्र धरित्रीवर म्हणजेच मातीवर पडले.

भूमीदेवीने साक्षात ब्रह्मर्षी भारद्वाजांच्या त्या दिव्य आणि प्रखर बीजाचा मोठ्या आदराने स्वीकार केला आणि आपल्या उदरात त्याचे रक्षण केले. त्या दिव्य तेजातून धरित्रीच्या उदरात एका तेजस्वी, देखण्या बालकाचा जन्म झाला. भूमीदेवीने त्या बालकाला स्वतःच्या पुत्राप्रमाणे वात्सल्याने वाढवले.

त्याचे जातकर्म, नामकरण, चूडाकर्म आणि प्राथमिक संस्कार स्वतः धरित्री मातेच्या छत्रछायेखाली संपन्न झाले.

जसजसा तो बालक मोठा होऊ लागला, तसतसा त्याच्या अंगाचा वर्ण धगधगत्या अग्नीच्या निखाऱ्यासारखा लाल, तेजस्वी आणि दैदिप्यमान दिसू लागला. निखाऱ्याला संस्कृतमध्ये 'अंगार' म्हणतात; त्यामुळे त्या अग्नीसारख्या लाल वर्णाच्या बालकाचे नामकरण 'अंगारक' असे झाले.

बालवयातून तारुण्यात पदार्पण करताना अंगारकाच्या मनात आपल्या मुळाविषयी, आपल्या जन्माविषयी कुतूहल निर्माण झाले. त्याने भूमीमातेला आपल्या पित्याविषयी विचारणा केली. भूमीदेवी त्याला आदरपूर्वक महर्षी भारद्वाजांच्या आश्रमात घेऊन गेली आणि ऋषींना घडलेला सर्व प्रसंग सांगून हा त्यांचाच तेजःपुत्र असल्याचे स्पष्ट केले.

महर्षी भारद्वाजांनी त्या दिव्य बालकाला अत्यंत प्रेमाने जवळ घेतले, त्याला पोटाशी लावले. ऋषींनी स्वतःच्या पुत्रावर वैदिक संस्कार केले, उपनयन संस्कार करून त्याला वेद, उपनिषदे आणि शास्त्रांचे संपूर्ण ज्ञान दिले. सर्व विद्यांचे अध्ययन पूर्ण झाल्यानंतर महर्षी भारद्वाजांनी अंगारकाला सांगितले की, या नश्वर जगात केवळ तपश्चर्येनेच शाश्वत पद आणि मोक्ष प्राप्त होतो;

म्हणून विश्वाचा मूलाधार असणाऱ्या भगवान श्रीगणेशाची अनन्यभावाने आराधना कर, कारण विघ्नहर्त्याच्या कृपेशिवाय तिन्ही लोकांत काहीही साध्य होत नाही. भारद्वाज ऋषींनी आपल्या पुत्राला गोपनीय अशा 'गणेश एकाक्षर मंत्रा'ची दीक्षा दिली.

पित्याची आज्ञा शिरसावंद्य मानून अंगारक पवित्र नर्मदा नदीच्या तीरावर एकांत तपोवनात गेला. तिथे त्याने एकाग्र चित्ताने, सर्व भौतिक सुखांचा त्याग करून केवळ गणेशचरणांचे ध्यान सुरू केले. ऋतू बदलले, कालचक्र फिरले, परंतु अंगारकाचे ध्यान किंचितही ढळले नाही.

तब्बल एक हजार वर्षे त्याने एका पायावर उभे राहून, केवळ वायूभक्षण करून घोर तपश्चर्या केली. त्याच्या शरीरातून निघणाऱ्या तपोतेजाने दाही दिशा उजळून निघाल्या.

शेवटी त्या अढळ भक्तीने, निष्ठेने आणि अखंड जपाने साक्षात विघ्नहर्ता परब्रह्म श्रीगणेशाचे सिंहासन हेलावले. माघ महिन्यातील शुक्ल पक्षातील चतुर्थीच्या पावन तिथीला, भर मध्यान्ही साक्षात भगवान गणेश आपल्या अत्यंत मनमोहक, चतुर्भुज आणि कोटी सूर्यांचे तेज असणाऱ्या रूपात अंगारकासमोर प्रकट झाले.

प्रभूंच्या अंगातून वाहणाऱ्या करुणामय प्रकाशाने अंगारकाचे डोळे उघडले. साक्षात आपल्या आराध्याला समोर पाहून अंगारकाच्या आनंदाला सीमा उरली नाही. त्याने लोटांगण घालून गणरायांच्या चरणांवर डोके टेकवले. आनंदाश्रूंनी गणपती बाप्पाच्या चरणकमलांचा अभिषेक झाला. अंगारकाने हात जोडून प्रभूंची अप्रतिम स्तोत्रांनी स्तुती केली.

त्याच्या अनन्य शरणागतीवर प्रसन्न होऊन गणरायांनी त्याला इच्छित वर मागण्याची आज्ञा केली. त्यावर अंगारकाने अत्यंत उदात्त आणि अमरत्वाची प्रार्थना केली. त्याने मागितले की, मला स्वर्गात सर्व देवांसोबत उच्च स्थान मिळावे, देवांसमवेत अमृतपानाचा दिव्य अधिकार प्राप्त व्हावा, आणि विश्वामध्ये माझी ओळख सदैव अमंगल नष्ट करणारी आणि 'मंगलमय' ठरावी.

गणेशांनी अत्यंत आनंदाने तथास्तु म्हटले आणि वरदान दिले की, आजपासून तू देवांमध्ये सन्माननीय स्थान मिळवून अमृतपान करशील. तुझी कीर्ती तिन्ही लोकांत 'मंगल' या नावाने अजरामर होईल.

तू लाल रंगाचा असल्याने तुला 'अंगारक', भूमीचा पुत्र असल्याने 'भौम', 'कुज' आणि 'धरणीपुत्र' या नावाने ओळखले जाईल, आणि तू नवग्रहांमध्ये अत्यंत पराक्रमी सेनापती म्हणून विराजमान होशील.

या वरदानानंतर दयाळू गणरायांनी अंगारकाच्या त्या अखंड तपाचा सन्मान करण्यासाठी विश्वाला एक परम कल्याणकारी तिथी बहाल केली. गणरायांनी स्पष्ट केले की, ज्या दिवशी चतुर्थी तिथीचा आणि मंगळवाराचा (अंगारकाचा वार) सुवर्णयोग जुळून येईल, ती तिथी विश्वात 'अंगारकी चतुर्थी' या नावाने ओळखली जाईल.

या दिवशी जो कोणी भाविक उपवास ठेवून, दुर्वा, रक्तचंदन आणि मोदक अर्पण करून माझी आराधना करेल, त्याचे सर्व ग्रहदोष, दारिद्र्य आणि संकटे तात्काळ नष्ट होतील. सामान्य चतुर्थीचे व्रत वर्षभर केल्यावर जे पुण्य फळ मिळते, ते केवळ एका अंगारकी चतुर्थीच्या व्रताने साधकाला प्राप्त होईल.

अशा प्रकारे अंगारकाच्या कठोर साधनेतून सर्वसामान्य मानवाला संकटांतून मुक्त करणारी ही महातिथी जन्माला आली.

अंगारकाने ज्या ठिकाणी गणेशाचे प्रत्यक्ष दर्शन घेतले, तिथे त्याने कृतज्ञतेने एका भव्य गणेशमूर्तीची स्थापना केली, ज्याला पुराणात 'मंगलमूर्ती' किंवा 'अंगारेश्वर गणेश' म्हणून ओळखले गेले.



रमेश देशपांडे
९४२३७९३२२६

# अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने गणरायासमोर 'पुस्तकांचा आरसा' देखावा

## वाचन संस्कृती वाढविण्यासह नव्या युवा वाचकांना प्रेरणा देण्याचा उपक्रम



अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने गणरायासमोर 'पुस्तकांचा आरसा' देखावा साकारण्यात आला आहे.

नगर– सर्वत्र गणेशोत्सवाची धामधूम सुरू असताना विद्येची देवता असलेल्या गणरायाच्या समोर विचारांची व वाचनाची वृद्धी व्हावी, तसेच समाजामध्ये वाचन संस्कृती अधिक रुजावी, या उद्देशाने अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने 'पुस्तकांचा आरसा' हा आकर्षक देखावा सादर करण्यात आला आहे. गणरायाच्या सान्निध्यात पुस्तकांचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या या देखाव्याला वाचक तसेच रसिक नगरकरांचा प्रतिसाद मिळत आहे. अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात विराजमान झालेल्या गणरायासमोर अध्यक्ष डॉ. राजेंद्र ठाकूर व प्रमुख कार्यवाहक विक्रम राठोड यांच्या संकल्पनेतून हा देखावा साकारण्यात आला आहे. वाचनाची आवड निर्माण करण्याबरोबरच पुस्तकांमधून विचारांची समृद्धी कशी होते, याचा संदेश या देखाव्यातून देण्यात आला आहे. वाचन संस्कृती वाढविणारे विविध सुविचार देखाव्यामध्ये ठळकपणे मांडण्यात आले असून, ते वाचकांचे लक्ष वेधून घेत आहेत.

गणरायाच्या मूर्तीसमोर विविध लोकप्रिय व वाचनीय पुस्तके आकर्षक पद्धतीने मांडण्यात आली आहेत. त्यामुळे गणेशोत्सवाच्या निमित्ताने वाचनालयात येणाऱ्या प्रत्येक वाचकाला पुस्तकांचे महत्त्व जाणवावे आणि वाचनाची आवड अधिक दृढ व्हावी, असा प्रयत्न करण्यात आला आहे. दररोज असंख्य वाचक जिल्हा वाचनालयाला भेट देत असतात. या वाचकांचे वाचन अधिक वृद्धिंगत करण्याबरोबरच नवीन युवा वाचक निर्माण होण्यासाठी 'पुस्तकांचा आरसा' हा देखावा समाजाला प्रेरणा देणारा ठरेल, असा विश्वास संचालक किरण आगरवाल व शिल्पा रसाळ यांनी व्यक्त केला.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक व वैचारिक संदेश देणारा उत्सव व्हावा, या उद्देशाने जिल्हा वाचनालयाने पुस्तकांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचा हा उपक्रम राबविला आहे. मोबाईल व डिजिटल माध्यमांच्या वाढत्या वापराच्या काळात पुस्तके आणि वाचनाची सवय यांचे महत्त्व अधोरेखित करणारा हा देखावा विशेष ठरत आहे. विशेषतः युवा पिढीने पुस्तकांकडे वळावे आणि नियमित वाचनातून आपली विचारशक्ती व ज्ञानसमृद्धी वाढवावी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे.

हा देखावा पाहण्याचे आवाहन जिल्हा वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, अनंत देसाई, खजिनदार तनवीर खान, सहकार्यवाह राहुल तांबोळी तसेच सदस्य, निमंत्रित सदस्य, ग्रंथपाल अमोल इथापे, सहग्रंथपाल नितीन भारतात व कर्मचारी यांनी केले आहे.

# 'स्वसंवाद' साधणे हा 'सुयशमार्ग : सुनील राऊत



नाट्य, लघुचित्रपट लेखक, अभिनेते, व्याख्याते सुनील राऊत यांचा सुयशमार्ग प्रेरणादायी संवाद व्याख्यान कार्यक्रम झाला.

भिंगार – बेलेश्वर गणेशोत्सव मंडळ, लीलावती पार्क, आलमगीर रोड येथे नाट्य, लघुचित्रपट लेखक, अभिनेते, व्याख्याते सुनील राऊत यांचा सुयशमार्ग प्रेरणादायी संवाद व्याख्यान कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रार्थनेनंतर प्रेरणादायी हिंदी कविता ऐकवुन राऊत व्याख्यानात पुढे म्हणाले की आपल्याला मिळालेल्या चोवीस तासांचा सदुपयोग करणं महत्वाचे आहे. आपल्या कुटुंबातील अभ्यास, मनन, चिंतनासाठी असणारे पोषक वातावरण, ए आयच्या आजच्या काळात शिक्षणासोबत कोणतीही एक कला आत्मसात करा. यशोशिखर ही अनुभूती देणारी कथा ऐकवली. या कथेवरिल प्रश्नांची उत्तरे उपस्थितांनी दिली, त्यांना राऊतान्नी बक्षिसे दिली. आपण स्वसंवाद साधणे गरजेचे असून त्यामुळे आपली बलस्थाने आणि दुर्बलस्थाने ओळखली पाहिजेत. ईएमआय चा दैनंदिन जीवनाशी उपयुक्त असणारा लाँग फॉर्म व्याख्यानात सांगितला. अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख, अमिताभ बच्चन, एपीजे अब्दुल कलाम, हेलन केलर, शाहरुख खान, सचिन तेंडुलकर, अरुणिमा सिन्हा, सीए रेखा मगदूम, स्टीफन हॉकिंगसह अनेकांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग यावेळी सांगितले. प्रात्यक्षिकासह वाचनाचे महत्त्व, आपल्या ध्येयाचे महत्त्व सांगितले. दरमहा एक पुस्तक विकत घेऊन वाचण्याचे आवाहन त्यांनी केले. वाचन आपल्याला समृद्ध बनवते, सुसंस्कारित करते आणि आपल्या ध्येयाकडे निश्चितच घेऊन जाते असे त्यांनी सांगितले. उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे राऊत यांनी दिली. अशा प्रकारच्या प्रेरणादायी संवादाची आज नितांत आवश्यकता असल्याचे उपस्थित पालक, शालेय महाविद्यालय विद्यार्थी यांनी सांगितले.

याप्रसंगी तेराशे पेक्षा अधिक गाणी गाणारे गिरीश कुलकर्णी, आणि ८७ वेळा रक्तदान करणारे श्रीकांत वराडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र द्रुमणे, अविनाश बेद्रे, सुजित गोटे, समीर वाघमारे, महेश भाकरे, चारूहास चव्हाण, प्रमोद बरबडे, प्रविण चव्हाण, ओंकार लिपारे, अशोक लोंढे, श्रेया गोटे, अनुराधा गोटे, श्रावणी बेद्रे, पल्लवी द्रुमणे, श्रुती वाघमारे, वैशाली वाघमारे, आरती बरबडे, सविता भाकरे, जयश्री नवले, सोनाली महाजन, जयश्री बेद्रे यांच्यासह लिलावती पार्कमधील रहिवासी उपस्थित होते.

# नगरमध्ये २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान 'गहना ज्वेलरी एक्झिबिशन'

**पुणे, मुंबईतील ज्वेलर्सचे खास कलेक्शन उपलब्ध**



नगर – नगरमधील आनंदऋषीजी हॉस्पिटल समोरील हॉटेल आयरिश येथे २६ ते २८ सप्टेंबर या कालावधीत गहना ज्वेलरी एक्झिबिशनचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १०.३० ते रात्री ८.३० यावेळेत हे विक्री प्रदर्शन सर्वांसाठी खुली असेल. महाराष्ट्रातील नामांकित ब्रॅण्डच्या एक्लुझिव्ह ज्वेलरी एक्झिबिशनमध्ये असणार आहेत, अशी माहिती 'गहना'चे धर्मेश खेरगांवकर यांनी दिली.


मन खेरगांवकर यांनी सांगितले की, सोने आणि डायमंड दागिन्यांबाबत ग्राहक अधिक चोखंदळ असतात. सध्याच्या डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात जगभरातील फॅशन ट्रेंड क्षणात सर्वत्र पोहोचतो. गहनाने असेच नवनवीन फॅशन ट्रेंड व पारंपरिक आभूषणे प्रदर्शनातून नगरकरांसाठी आणले आहेत. नववधूचे सौंदर्य खुलवणारे खास दागिने यात असतील. या एक्झिबिशनमध्ये मुंबई येथील ॲडमंटाईन ज्वेलरी या ब्रॅण्डचे खास डायमंड ज्वेलरी कलेक्शन असणार आहे. ॲडमंटाईनच्या प्रशिक्षित व अनुभवी टीमचा उच्च दर्जाचे डायमंड कटिंग व दागिने तयार करण्यात हातखंडा आहे. प्रत्येक दागिना अतिशय सुंदर कलाकुसर आणि आखीवरेखीव असेल याची विशेष काळजी घेतली जाते. विश्वसनीयता जपत ग्राहकांना त्यांचे मनपसंत डिझाईनचे दागिने उपलब्ध करून दिले जातात. या नामांकित ब्रॅण्डचे नितांतसुंदर कलेक्शन नगरमध्ये उपलब्ध होत आहे.

प्रदर्शनात ३३ वर्षांची परंपरा असलेल्या मुंबईतील सोहम क्रिएशनच्या दागिन्यांची खास व्हरायटी उपलब्ध असणार आहे. यात डेली वेअर डिझाईन, नववधूचे सौंदर्य खुलवणारे खास दागिने आप्तस्वकीय, प्रियजनांना देण्यासाठी खास गिफ्ट आर्टिकल उपलब्ध असतील. अप्रतिम कारागिरी व सौंदर्य सोहमच्या दागिन्यांचे वैशिष्ट्य आहे.

पुण्यातील कियान सिल्व्हरची खास रेंज प्रदर्शनात ठेवण्यात येणार आहे. लेसर कट आणि ॲंटिक सिल्व्हर ज्वेलरी वुईथ रेडिएंट गोल्ड फिनिशिंग, सिल्व्हरच्या किंमतीत सोन्याच्या दागिन्यांची अनुभुती लाईट वेट मध्ये उपलब्ध आहेत. याशिवाय पुण्यातीलच अतिशय दीर्घ परंपरा असलेले एन. डब्ल्यू. शामसेट (एन.डब्ल्यू.एस.) ज्वेलर्सची खासियत असलेली ज्वेलरी या प्रदर्शनात असेल. डायमंड, पोलकी आणि १८ कॅरेट गोल्ड या ज्वेलर्सचे वैशिष्ट्ये आहे. एक्स्लुसिव्ह डिझाईनची ज्वेलरी मनाला भावणारी ठरेल.

आगामी नवरात्र, दसरा दिवाळी निमित्त सोन्याची व डायमंडची मौल्यवान खरेदी आवर्जून केली जाते. अनेकदा नगरमधील ग्राहक पुणे, मुंबईतील शोरूममध्ये खरेदीसाठी जातात. गहना ज्वेलरी प्रदर्शनामुळे मोठ्या महानगरांतील शोरूम्स आपले खास कलेक्शन घेऊन नगर शहरात येत आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क: ९८९२३९८३६०.

## वंदू गणेशा...



**रेखाचित्रकार दिलीप शहापूरकर,**
माणिकचौक, अ.नगर
मो.७९७२९८९७८०



'श्रीगणेशा आरोग्याचा' या आरोग्य अभियान २०२६ अंतर्गत तपोवन हडको येथील ढवण वस्ती परिसरात मोफत सर्वरोग निदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

# आरोग्य अभियान २०२६ अंतर्गत तपोवन हडको येथे मोफत सर्वरोग निदान व आरोग्य तपासणी शिबिर

नगर – महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ तसेच आयुष्मान भारत जन आरोग्य योजना अंगीकृत रुग्णालय यांच्या समन्वयातून राबविण्यात येत असलेल्या श्रीगणेशा आरोग्याचा या आरोग्य अभियान २०२६ अंतर्गत तपोवन हडको येथील ढवण वस्ती परिसरात मोफत सर्वरोग निदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

द साल्व्हेशन आर्मी इव्हॅन्जलीन बूथ हॉस्पिटल आणि तपोवन हडको येथील राजा अष्टविनायक गणपती मित्र मंडळ, ढवण वस्ती यांच्या संयुक्त विद्यमाने हे आरोग्य शिबिर घेण्यात आले.

या शिबिरामध्ये बूथ हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी केली. यामध्ये डॉ. मीना फुके, जनरल फिजिशियन आणि डॉ. वृषाली महांडुळे, त्वचारोग तज्ज्ञ यांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले. शिबिरात ६१ नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. तसेच नागरिकांची मोफत रक्त तपासणी करण्यात आली आणि आवश्यक औषधांचे मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी बूथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर सुरेंद्र चोपडे, ऊर्जिता सोशल फाऊंडेशनच्या संध्या मेढे, अनिल ढवण आणि प्रवीण साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उद्घाटनपर भाषणात बूथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर सुरेंद्र चोपडे यांनी शिबिरात तपासणी करण्यात आलेल्या रुग्णांना आवश्यक असल्यास बूथ हॉस्पिटलमध्ये कमीत कमी खर्चात पुढील उपचार उपलब्ध करून देण्यात येतील, असे सांगितले. नागरिकांनी आरोग्याची नियमित तपासणी करून आजारांचे वेळेत निदान व उपचार करून घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या आरोग्य शिबिराच्या आयोजनासाठी विजय कसबे, आनंद नायडू, सौ. शोभा चव्हाण, आयडियल हेल्पिंग हॅंड नर्सेस, आरोग्य मित्र शरद कोंडा यांचे सहकार्य लाभले. तसेच गणेश मंडळाचे कार्यकर्ते मुकेश आंबेकर, सौरभ म्हस्के आणि बूथ हॉस्पिटलचे अमित पठारे यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी राजा अष्टविनायक गणपती मित्र मंडळाचे अध्यक्ष सुरज जगधने, खजिनदार सौरभ म्हस्के, उपाध्यक्ष निखिल नलगे यांच्यासह अतुल टाके, मुकेश आंबेकर, अजिंक्य पवार, अमित शेख, अभिषेक गवळी, रोहित कोडम, अंकुश रोकडे, सविता कोडम, सुरेखा जगधने, रुकसाना शेख, आशा नलगे, भारती उषा कोयल आणि सोनी रोकडे यांनी सहकार्य केले.

आरोग्य तपासणीसारख्या उपक्रमांमुळे परिसरातील नागरिकांना त्यांच्या आरोग्याबाबत आवश्यक मार्गदर्शन मिळून वेळेवर निदान, उपचार आणि आरोग्यविषयक जनजागृतीला चालना मिळते, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# अवघ्या पाच मिनिटांत गणितांचा 'महासंग्राम'

**अहिल्यानगरात रंगली राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा; 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' विजेत्यांचा दिमाखात गौरव; वेगवान गणिती कौशल्याने विद्यार्थ्यांनी जिंकली मने**



एमआयडीसी येथील स्नेहालयात युनिव्हर्सल अबॅकस अ‍ॅण्ड वैदिक मॅथ्स असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत विविध जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

नगर – एमआयडीसी येथील स्नेहालयात युनिव्हर्सल अबॅकस अ‍ॅण्ड वैदिक मॅथ्स असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत विविध जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. अवघ्या पाच मिनिटांच्या राऊंडमध्ये मोठमोठी गणिते अचूकपणे सोडवून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची वाहवा मिळविली. पुणे, नवी मुंबई, कल्याण, छत्रपती संभाजीनगर, बीड, शेवगाव, श्रीगोंदा तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध भागांमधून विद्यार्थी स्पर्धेसाठी सहभागी झाले होते.

स्पर्धेच्या सकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली. ज्युनिअर, मास्टर ज्युनिअर, लेव्हल १ ते ५ आणि वैदिक मॅथ्स अशा विविध गटांमध्ये ही स्पर्धा पार पडली. प्रत्येक गटातील विद्यार्थ्यांसमोर वेळेचे आव्हान होते. अवघ्या पाच मिनिटांच्या राऊंडमध्ये गणिती प्रक्रियेवर आधारित प्रश्नपत्रिका सोडवायची होती. वेळ कमी असतानाही विद्यार्थ्यांनी कोणताही दबाव न घेता वेगाने गणिते सोडविली. अनेक विद्यार्थ्यांनी दिलेल्या वेळेपूर्वीच प्रश्नपत्रिका पूर्ण केल्याने त्यांच्या गणनावेगाचे आणि सरावाचे उपस्थितांनी कौतुक केले.

स्पर्धेनंतर आयोजित करण्यात आलेल्या पारितोषिक वितरण सोहळ्यास महापालिका महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर, जिल्हा परिषदेच्या केंद्रप्रमुख मीनाक्षीताई दराडे, मुख्याध्यापिका शीतल गुंदेचा, ॲड. उज्वला मुरकुटे आणि योगा प्रशिक्षिका शिल्पा बालवे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. पाहुण्यांचे स्वागत सुनील काळाणे यांनी केले.

प्रास्ताविकात हेमलता काळाणे यांनी अबॅकसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना मिळत असल्याचे सांगितले. अबॅकसच्या सरावामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता, गणनावेग आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. स्पर्धा परीक्षांच्या तयारीतही अबॅकस व वैदिक मॅथ्स उपयुक्त ठरू शकतात, असे त्यांनी नमूद केले.

दिपालीताई बारस्कर म्हणाल्या की, युनिव्हर्सल अबॅकसच्या माध्यमातून संपूर्ण जिल्ह्यात अबॅकसची चळवळ रुजत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही अबॅकसचे शिक्षण सहज उपलब्ध होत आहे. चांगल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा मिळते. युनिव्हर्सल अबॅकसने शिक्षकांची चांगली टीम तयार करून विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य सुरू ठेवले आहे. 'विद्या हे सर्वश्रेष्ठ दान असून, त्याचा लाभ आयुष्यभर मिळतो,' असेही त्यांनी सांगितले.

मीनाक्षीताई दराडे यांनी स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी गुणवत्तेला महत्त्व असल्याचे सांगितले. अबॅकसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला चालना मिळते. बदलत्या काळात एआयमुळे शिक्षण क्षेत्रात झपाट्याने बदल होत असून, विद्यार्थ्यांनी त्यानुसार स्वतःला विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अथर्व जाधव (छत्रपती संभाजीनगर), आदित्य कोळगे (शेवगाव), मयंक साळवे (बोल्हेगाव फाटा), स्वरा चिपाडे, अर्णव फुलारी, कियान खत्ती (सारसनगर), इंद्रनील सावंत, आराध्या बुधवंत (गुलमोहर रोड, सावेडी), वेदांत कोथांबीरे, अलोक खेतमालीस (श्रीगोंदा) आणि तन्मय खंडागळे (एमआयडीसी, नागापूर) यांनी 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन'चा मान पटकाविला. सर्व गटांतील प्रथम पाच क्रमांकाच्या विजेत्यांना आकर्षक ट्रॉफी व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांसोबतच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

स्पर्धेचे परीक्षण सविता काकडे, अश्विनी शार्दुल, दिपाली अदलींग, मंजुषा फल्ले, सना सय्यद, अश्विनी मुंडे, वैशाली तारू आणि राधिका दहातोंडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋग्वेदी काकडे यांनी केले.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी युनिव्हर्सल अबॅकस असोसिएशनचे सुनील काळाणे, बाळासाहेब दहातोंडे, विशाल आढाव, स्वाती घुले, शीतल वाबळे, रुपाली वाजे, स्वप्नाली माळी, प्रिया शेंडगे व असोसिएशनच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# हॉटेलिंग क्षेत्रात बोरुडे परिवाराचा विशेष नावलौकिक

**आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; सावेडीत 'द विवान प्राईड'चे उद्‌घाटन**



ऑक्सिलियम कॉन्व्हेंट स्कूलजवळ नव्याने उभारण्यात आलेल्या 'हॉटेल द विवान प्राईड' चे उद्घाटन आ. संग्राम जगताप आणि सौ. धनश्रीताई विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – हॉटेल व्यवसाय क्षेत्रात दर्जेदार आदरातिथ्य, उत्तम सेवा आणि आधुनिक सुविधांच्या माध्यमातून बोरुडे परिवाराने विशेष नावलौकिक निर्माण केला आहे. 'द विवान प्राईड'च्या माध्यमातून सावेडी परिसरातील नागरिकांना दर्जेदार आदरातिथ्याची सुविधा उपलब्ध होईल, असा विश्वास आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केला.

सावेडी नाका परिसरातील ऑक्सिलियम कॉन्व्हेंट स्कूलजवळ नव्याने उभारण्यात आलेल्या 'हॉटेल द विवान प्राईड' चे उद्घाटन आमदार संग्राम जगताप आणि सौ. धनश्रीताई विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी हिराबाई बोरुडे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, संदीप बोरुडे, प्रदीप बोरुडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, माजी महापौर भगवान फुलसौंदर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी सभापती पुष्पाताई बोरुडे, उपसभापती वर्षा सानप, दगडू पवार, नगरसेविका शारदाताई ढवण, सुनिता फुलसौंदर, आशाताई डागवले, रोशनी त्रिंबके, रूपाली वारे, सुप्रिया जाधव, अश्विनी बोरुडे, नगरसेवक दत्ता गाडळकर, गणेश कवडे, बाळासाहेब पवार, राजाभाऊ मुळे, ज्ञानेश्वर काळे, किशोर डागवले, करण कराळे, नाना भामरे, अनिल झोडगे, महेश लोंढे, संभाजी पवार, मोहन मानधना आदींसह उपस्थित होता.

धनश्री विखे पाटील म्हणाल्या की, हॉटेल व्यवसायातील प्रदीर्घ अनुभव आणि सातत्यपूर्ण गुणवत्तेच्या बळावर बोरुडे परिवाराने अहिल्यानगरमध्ये आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. हॉटेल संगम, व्ही स्टार, पंचरत्न आणि न्यू पंचरत्न या लोकप्रिय हॉटेल्सनंतर 'द विवान प्राईड'च्या माध्यमातून बोरुडे परिवाराने आपल्या व्यवसायाचा विस्तार केला आहे. खवय्या प्रेमींना या हॉटेलच्या माध्यमातून चांगले खाद्यपदार्थ उपलब्ध होतील, असे त्यांनी सांगितले.

अनिल वसंतराव बोरुडे, संदीप वसंतराव बोरुडे, प्रदीप हरिभाऊ बोरुडे आणि समस्त बोरुडे परिवाराच्या पुढाकारातून 'द विवान प्राईड'ची उभारणी करण्यात आली आहे. सावेडी परिसराचा झपाट्याने होत असलेला विस्तार लक्षात घेऊन ग्राहकांच्या विविध गरजा एकाच ठिकाणी पूर्ण करण्याच्या उद्देशाने हॉटेलची रचना करण्यात आली आहे.

संचालक अनिल बोरुडे म्हणाले की, हॉटेलमध्ये अनुभवी कुकद्वारे तयार केले जाणारे विविध शाकाहारी पदार्थ उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच प्रशस्त व आकर्षक बँक्वेट हॉलची सुविधा असून कौटुंबिक समारंभ, विवाह सोहळे, वाढदिवस तसेच कॉर्पोरेट कार्यक्रमांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत. शहरात येणाऱ्या पाहुण्यांसाठी आधुनिक सुविधांनी सज्ज अशा आरामदायी खोल्यांचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

हॉटेल व्यवसायात बोरुडे परिवाराने निर्माण केलेल्या विश्वासार्हतेचा उल्लेख करत आमदार संग्राम जगताप यांनी 'द विवान प्राईड'च्या माध्यमातून सावेडी परिसराच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यास मदत होईल, असे सांगितले.

दर्जेदार आदरातिथ्य, चांगली सेवा आणि आधुनिक सुविधांमुळे हे हॉटेल ग्राहकांसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



छत्रपती शिवाजी राजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगरच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा ग्रामसेवकांचे जिल्हाप्रमुख आनंद भंडारी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

# छत्रपती शिवाजी राजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन

नगर – छत्रपती शिवाजी राजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगरच्या ४८ व्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा ग्रामसेवकांचे जिल्हाप्रमुख आनंद भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, दादाभाऊ गुंजाळ, राजेंद्र देसले, मुख्य वित्त व लेखा अधिकारी मोरे, गटविकास अधिकारी आदी उपस्थित होते

जिल्हा परिषद कार्यालयात झालेल्या या प्रकाशन सोहळ्यास पतसंस्थेचे चेअरमन संतोष साबळे, व्हा. चेअरमन सुधीर उंडे, मानद सचिव गोटीराम मडके, सरचिटणीस पोपटराव रासकर, संघटक बाजीराव पवार, तज्ञ संचालक ज्ञानदेव शिंदे, संचालक सुधाकर पगारे, श्रीकांत साळे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी संघ, जिल्हा शाखेचे जिल्हाध्यक्ष किशोर सुगंधा जेजुरकर, जिल्हा सचिव शशी नरोडे, मुख्यालय उपाध्यक्ष राहुल गांगर्डे, उत्तर विभाग उपाध्यक्ष देवेंद्र वारुळे, दक्षिण विभाग उपाध्यक्ष उपेंद्र पोटे, प्रसिद्धी प्रमुख स्वप्निल आंबेटकर, कोपरगाव तालुकाध्यक्ष राजेंद्र बागले, सचिव थोरात, माजी चेअरमन प्रताप साबळे, माजी व्हा. चेअरमन हरीश भालेराव, तसेच विस्तार अधिकारी बाळासाहेब कांडेकर यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पतसंस्थेच्या वर्षभरातील कामकाज, आर्थिक स्थिती, ठेवी, कर्जवाटप व मयत सभासदांना शंभर टक्के कर्ज माफ, सभासदांना व त्यांच्या पाल्यांच्या विवाहासाठी अकरा हजार रुपयांचे मदत, सहा लाख रुपयापर्यंत कर्ज फक्त ६% व्याजदराने देणारी महाराष्ट्रातील कर्मचारी संस्थेमध्ये एकमेव संस्था आहे तसेच विविध संस्थेच्या व संघटनेच्या या उपक्रमांचा लेखाजोखा या अहवालात मांडण्यात आला आहे.

# डॉ.सुरश्री सोनवणे यांना पर्यावरणशास्त्र विषयात पीएच.डी.



नगर – पर्यावरणशास्त्र विषयातील संशोधक सुरश्री सुरेंद्रकुमार सोनवणे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथून पर्यावरणशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. त्यांच्या संशोधनाचा मौखिक परीक्षेचा टप्पा १८ सप्टेंबर रोजी यशस्वीरीत्या पार पडला.

डॉ.सुरश्री सोनवणे यांनी पदव्युत्तर संशोधन केंद्र, पर्यावरणशास्त्र विभाग, न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, अहिल्यानगर येथून आपले संशोधन पूर्ण केले. त्यांच्या संशोधनाचा विषय 'भूजलामुळे पृथ्वीच्या पृष्ठभागावर निर्माण होणाऱ्या भू-विद्युतचुंबकीय क्षेत्राची ओळख व रुंदी मोजण्यासाठी लेझर प्रकाश किरणाचा उपयोग' असा आहे. या संशोधनामध्ये भूजलामुळे पृथ्वीच्या पृष्ठभागावर निर्माण होणाऱ्या भू-विद्युतचुंबकीय क्षेत्राची ओळख व त्याची रुंदी मोजण्यासाठी लेझर प्रकाश किरणावर आधारित तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्यात आला आहे.

या संशोधनासाठी बारामती परिसराचा सविस्तर अभ्यास करण्यात आला. विविध ठिकाणी ग्रिड पद्धतीने सर्वेक्षण करून तसेच नव्याने विकसित केलेल्या लेझर लाईट बीम उपकरणाचा वापर करण्यात आला. या माध्यमातून भूजलाशी संबंधित व्याप्ती व रुंदी मोजण्याचा प्रयत्न करण्यात आला. पारंपरिक पद्धतींच्या तुलनेत लेझर लाईट बीम पद्धतीची उपयुक्तता व कार्यक्षमता तपासण्यात आली. भूजल हे पिण्याचे पाणी तसेच शेतीसाठी महत्त्वाचे नैसर्गिक साधन आहे. त्यामुळे भूजलाशी संबंधित पर्यावरणीय घटकांचा अभ्यास करून सुरक्षित व शाश्वत बांधकाम नियोजनासाठी उपयुक्त माहिती उपलब्ध करून देणे हा या संशोधनाचा महत्त्वाचा उद्देश आहे.

हे संशोधन मार्गदर्शक डॉ. नंदकुमार धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व सहमार्गदर्शक डॉ. सतीश कुलकर्णी यांच्या सहकार्याने पूर्ण करण्यात आले. संशोधनाच्या विविध टप्प्यांमध्ये मिळालेले मार्गदर्शन, सहकार्य व प्रोत्साहन याबद्दल डॉ. सुरश्री सोनवणे यांनी मार्गदर्शकांचे आभार मानले.

डॉ. सूरश्री या हिंगनगावच्या प्रथम महिला सरपंच सौ स्मिताताई आणि हिंगनगावचे प्रथम लोकनियुक्त सरपंच तसेच रयत शिक्षण संस्थेचे सल्लागार समितीचे सदस्य व सरपंच परिषद राज्य कोअर कमिटी प्रमुख आबासाहेब सोनवणे पाटील यांची कन्या आहेत.



मराठा समाजातील उद्योजकांच्या उन्नतीसाठी पुणे येथून सुरू करण्यात आलेल्या मराठा एंटरप्रेनर्स असोसिएशनच्या अहिल्यानगर शाखेचे उद्घाटन पुणे येथील सारथी सभागृहात माजी केंद्रीय मंत्री शरदचंद्र पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर आमदार रोहित पवार आदी.

# मराठा एंटरप्रेनर्स असोसिएशनच्या अहिल्यानगर शाखेचे पुण्यात उद्‌घाटन

नगर – मराठा समाजातील उद्योजकांच्या उन्नतीसाठी पुणे येथून सुरू करण्यात आलेल्या मराठा एंटरप्रेनर्स असोसिएशनच्या अहिल्यानगर शाखेचे उद्घाटन पुणे येथील सारथी सभागृहात माजी केंद्रीय मंत्री शरदचंद्र पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर आमदार रोहित पवार उपस्थित होते. यावेळी एम. इ. ए. आयोजित इंटरनॅशनल बिझनेस एक्सपो २०२७ याचे लॉन्चिंग श्री. पवार यांच्या हस्ते करण्यात आले. सदर एक्स्पो हा ४ ते ७ मार्च २०२७ मध्ये होत आहे.

यावेळी ते म्हणाले की, मराठा समाज हा आता विचारात्मक पावले उचलत आहे. पूर्वी ७०% मराठा समाज हा फक्त शेतीवर अवलंबून होता पण आत्ताची पिढी ही बदलत्या काळाबरोबर बदलत आहे आणि शेती जोडधंदा व उद्योग व्यवसायात उतरली आहे. यांना बळ देण्याचे एकत्र आणण्याचे मोठे काम ही असोसिएशन करत आहे ही बाब गौरवास्पद आहे.

यावेळी बोलताना आमदार रोहित पवार म्हणाले की पूर्वी उद्योग व्यवसाय हा काही ठराविक शहरांपुरता मर्यादित होता पण आता ग्रामीण भागापर्यंत उद्योग गेले असून या उद्योगधंद्यांना मूलभूत पायाभूत सुविधा मिळणे गरजेचे आहे याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. या असोसिएशनने अल्पावधीत भरारी घेऊन आपले स्वरूप पुणे, पिंपरी चिंचवड, चाकण यापुरते मर्यादित न ठेवता पूर्ण महाराष्ट्र राज्याचा विचार करून विविध ठिकाणी शाखा सुरू केल्याने पूर्ण महाराष्ट्रातील उद्योजकांना एक व्यासपीठ मिळणार आहे. माझे संपूर्ण सहकार्य राहील असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष विक्रम गायकवाड म्हणाले, महाराष्ट्रात सर्वाधिक मराठा समाज असताना सुद्धा पाच टक्क्यापर्यंत समाज हा उद्योग व्यवसायात आहे तो जास्तीत जास्त कसा उद्योग व्यवसायात येईल यासाठी आमचा भर आहे. तसेच मागच्या वर्षी झालेले एक्सपो हे अभूतपूर्व झाले. उद्योजकांना मोठा प्रतिसाद मिळाला ते पाहून आता ४ ते ७ मार्च या दरम्यान पुन्हा एक्सपो घेण्यात येत आहे.

यावेळी असोसिएशनचे माजी अध्यक्ष अंकुश आसबे, अरुण निमन, सई पाटील, संग्राम देशमुख सायली काळे, राजेश कुन्हाडे यांच्यासह नगर टीमचे समन्वयक राकेश गोड, विनोद बांगर, संदेश मगर, एम ई ए नगर शाखेचे अध्यक्ष किशोर मरकड, सचिव जयद्रथ खाकाळ, उपाध्यक्ष सुधीर लांडगे, खजिनदार सुमित सोनवणे आदींसह पुणे विभागाचे पदाधिकारी व राज्यातील मराठा उद्योजक उपस्थित होते.

# कॅलिडोस्कोप



## कलिंगडाचे वजन १५९ किलो!

कलिंगड उन्हाळ्यात शरीराला थंडावा देते आणि ताजेतवाने ठेवते. एका अशा कलगडाची चर्चा ऐकून कुणीही थक्क होईल. हे कलिंगड इतके मोठे होते, की त्याला उचलायला क्रेनची मदत घ्यावी लागली. जगातील सर्वात मोठे कलगड जगासाठी चर्चेचा विषय बनले होते. या विशाल कलगडाचे वजन इतके होते, की त्याला सामान्य माणसाने उचलण शक्यच नव्हते. २०13 मध्ये अमेरिकेच्या क्रिस केंट यांनी हे कलिंगड पिकवले होते. त्यांच्या मेहनतीचे फळ म्हणून या कलगडाचे वजन तब्बल १५९ किलो भरले, जे 'द वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ गिनीज बुक' मध्ये नोंदवले गेले. हे कलिंगड एका साधारण कलिंगडापेक्षा १५ पट जास्त जड होते. त्यामुळे ते उचलण्यासाठी विशेष यंत्रणा लागली. क्रिस केंट यांनी स्वतःच्या खास बियांपासून हे कलगड पिकवले होते. प्रदर्शनासाठी ते घेऊन जाण्यासाठी त्याला क्रेनचा वापर करावा लागला. हे बघण्यासाठी आजूबाजूच्या लोकांची मोठी गर्दी झाली होती. या घटनेने सर्वांनाच आश्चर्यचकित केले होते. हे कलगड क्रेनने उचलून एका खास जागी ठेवले होते, जेणेकरून त्याचे वजन आणि आकार सर्वसामान्यांना पाहता येईल. भारतात कलगडाची शेती उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणात केली जाते. भारतात एकूण कलगड उत्पादन सुमारे २,४९५ हजार टन आहे. कलिंगडात सुमारे ९२ टक्के पाणी असल्यामुळे ते शरीराला थंड ठेवते आणि पाण्याची कमतरता दूर करते. याशिवाय, कलगडात अनेक जीवनसत्त्वे आणि पोषक घटक असतात, जे आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात.

**भारतात कोणत्या राज्यात जास्त उत्पादन?**

उत्तर प्रदेश हे भारतात सर्वात जास्त कलिंगडाचे उत्पादन घेणारे राज्य आहे. येथील सुपीक जमीन आणि हवामान कलिंगड पिकवण्यासाठी खूप अनुकूल आहे. २०२१-२२ मध्ये उत्तर प्रदेशमध्ये १६.८६ हजार हेक्टर जमिनीवर कलिंगडाची शेती झाली होती, जे भारतातील एकूण उत्पादनाचा सर्वात मोठा भाग होते. २०२४ मध्येही उत्तर प्रदेशातच कलिंगडाची सर्वाधिक शेती झाली.

## आवाजाचे नोट्समध्ये रूपांतर करणारे मशीन

केरळच्या अभियांत्रिकीच्या काही विद्यार्थ्यांनी एक मशीन बनवले आहे. ते आवाज ऐकते आणि ते हस्तलिखित नोट्समध्ये रूपांतरित करते. हे आश्चर्यकारक मशीन लिहिता येत नसणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल. सोशल मीडियावर या शोधाची खूप चर्चा होत आहे. केरळच्या विद्यार्थ्यांनी 'एआय' मशीन मॉडेल बनवले आहे. अभियांत्रिकीचा अभ्यास करणारा विद्यार्थी अजय एच. आणि त्याच्या टीमने एक अनोखे मशीन बनवले आहे. या मशीनचे नाव 'टॉक टू राइट' आहे. तुम्हाला फक्त बोलायचे आहे आणि मशीन तुमचे बोललेले शब्द कागदावर लिहिते. हे मशीन नुकतेच 'एन्टे केरलम एक्स्पो' नावाच्या एका मोठ्या सरकारी कार्यक्रमात दाखवण्यात आले.

अजयच्या म्हणण्यानुसार हे मशीन बोललेले शब्द जसे आपण हाताने लिहितो तसेच लिहिते. मशीनला एक मायक्रोफोन जोडलेला असतो. समोरची व्यक्ती बोलल्यानंतर ऐकून घेणारे मशीन हळूहळू ए-४ कागदावर त्याच्या पेनने लिहिते. तेही अगदी सुबक अक्षरात, ओळीमध्ये. फक्त बोलून, ते कागदावर आज्ञा लिहिते. हे मशीन बनवण्यासाठी रास्पबेरी पाई, आर्डिनो (जीआरबीएल) आणि पायथॉन नावाच्या तंत्रज्ञानाचा वापर केला गेला आहे. या सर्व तंत्रज्ञानाचा वापर संगणक, रोबोट आणि प्रोग्रामगमध्ये केला जातो; परंतु अजय आणि त्याच्या टीमने त्यांचा वापर डिजिटल स्क्रिब (म्हणजे तुमच्या वतीने लिहू शकणारा सहाय्यक) बनवण्यासाठी केला आहे. याचा सर्वात मोठा फायदा शारीरिकदृष्ट्या कमकुवत लोकांना होईल. हाताने लिहू न शकणारे कवा बोलून काम करू इच्छिणाऱ्यांना हे तंत्र कुठेही उपयुक्त ठरू शकते, मग ते शाळा, ऑफिस कवा घर असो..




## स्वतः बॅटरी बदलणारा रोबो

कल्पना करा, तुमचा मोबाईल स्वतः चार्जिंग स्टेशनवर जाऊन त्याची बॅटरी काढून नवीन बॅटरी लावत असेल तर... तर तुम्हाला कसे वाटेल? आता एका रोबोटनेही असेच काम केले आहे. रोबो बनवणाऱ्या चीनच्या प्रसिद्ध यूबी टेक रोबोटिक्स कंपनीने वॉकर एस२ नावाचा मानवासारखा भासणारा रोबो बनवला आहे. या रोबोने असा जुगाड बनवला आहे, की आता त्याला थांबून चार्ज करण्याचीही गरज नाही. बॅटरी कमी होते, तेव्हा तो स्वतः बॅटरी बदलणाऱ्या स्टेशनवर जातो आणि त्याची एक बॅटरी काढून चार्जिंगवर ठेवतो आणि दुसरी पूर्ण चार्ज असलेली बॅटरी लावतो. नंतर तो न थांबता पुन्हा कामाला लागतो. हे अद्भूत तंत्रज्ञान दुहेरी बॅटरी सिस्टीमवर काम करते. म्हणजे त्यात दोन बॅटरी आहेत. ही सिस्टिम एका बॅटरीसह काम करते आणि तुम्हाला हवे तेव्हा दुसरी बदलू शकते. यामुळे ती कधीही बंद करावी लागत नाही. चार्जिंगचा त्रास नाही, व्यत्यय येत नाही. एक बॅटरी संपू लागते, तेव्हा रोबो काय करायचे ते समजून घेतो. जणू एखाद्या माणसाला भूक लागली आहे आणि तो कोणालाही न सांगता स्वतः जाऊन अन्न खातो. तशीच या रोबोटची बॅटरी बदलण्याची संपूर्ण प्रक्रिया खूप सोपी आणि मजेदार आहे. वॉकर एस२ त्याच्या हातांनी मागच्या बाजूला जोडलेली बॅटरी काढून शेल्फमध्ये ठेवतो आणि तिथून एक नवी बॅटरी काढून आत घालतो. हे काम करण्यासाठी त्याला फक्त काही मिनिटे लागतात. त्याला कोणत्याही मदतीची आवश्यकता पडत नाही कवा कोणत्याही सूचनांची आवश्यकता रहात नाही. तो हे सर्व स्वतः करतो. ही



प्रणाली चीनमधील काही इलेक्ट्रिक कारसारखी आहे, जिथे बॅटरी चार्ज करण्याऐवजी थेट त्या बदलल्या जातात. सोशल मीडिया वापरकर्ते त्यावर वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया देत आहे. एका वापरकर्त्याने लिहिले, 'मानव स्वतः श्वास घेऊ शकतात आणि खाऊ शकतात, रोबो ही आता नवी गोष्ट राहिलेली नाही.' दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले, 'रोबो एके दिवशी सर्व मानवांना खातील. दुसऱ्या एका वापरकर्त्याने लिहिले, एक दिवस जगात फक्त रोबो असतील आणि माणूस पुस्तकांमध्ये अस्तित्वात असेल.

## ये दोस्ती...



युरोपमधल्या पर्वतरांगांमध्ये आढळणारा मेर्मोट हा प्राणी लाजराबुजरा आहे. मेर्मोट माणसांजवळ जात नाही. तो बिळामध्ये राहतो. माणसं जवळ आली की लगेच बिळात निघून जातो. मेर्मोट खूप चपळ असतो. शेकरू कवा खारीसारखा दिसणारा मेर्मोट खूप गोंडस असतो. ऑस्ट्रियाचा मेटियो वॉच या मेर्मोटचा मित्र आहे. प्राणी आणि माणसाच्या मैत्रीच्या बऱ्याच कथा आपण ऐकल्या आहेत. मेर्मोट आणि मेटियो यांची मैत्रीही अशीच अनोखी आहे. गेल्या अकरा वर्षांपासून मेर्मोट आणि मेटियो यांच्यात मैत्रीचे बंध जुळले आहेत. मेटियो दरवर्षी या मेर्मोटना भेटायला येतो. मेटियो आल्यावर मेर्मोट खूप खूश होतात. १४ वर्षांचा मेटियो इन्सबूकला राहतो. २०१२ मध्ये मेटियो आणि मेर्मोटमधली ही मैत्री चर्चेचा विषय ठरली होती. मेर्मोट आणि मेटियो यांच्यात मैत्री नेमकी कशी झाली हे कोणालाही माहीत नाही. पण हे मेर्मोट मेटियोला अजिबात घाबरत नाहीत. उलट, त्याच्यासोबत खेळतात. मेटियोची आई मेर्मोट आणि मेटियोचे फोटोही काढते. मेटियोची अगदी लहानपणीच मेर्मोटशी मैत्री झाली होती.



## पत्नीला प्रायव्हेट जेटची भेट

लग्नाच्या वाढदिवसानिमित्त अनेक जण पत्नीला कार, दागिने किंवा महागड्या वस्तू भेट देतात; मात्र 'सोशल मीडिया' इन्फ्लुएन्सर रेबेका मा उर्फ 'बेक्का ब्लूम' यांच्या वडिलांनी पत्नीला थेट प्रायव्हेट जेट भेट देण्याचा निर्णय घेतला.

रेबेका आपल्या आई-वडिलांसोबत प्रायव्हेट जेट डीलरकडे पोहोचल्या. या वेळी त्यांनी जेटमधून प्रवासाचा अनुभव घेतला. तसेच कॉकपिटमध्ये जाऊन पायलटकडून विमान कसे चालवले जाते, याची माहिती घेतली. या संपूर्ण प्रसंगाचे चित्रीकरणही करण्यात आले. रेबेकाच्या आईची नुकतीच हिप सर्जरी झाली आहे. त्यामुळे विमानात चढताना त्यांना त्रास होऊ नये, याची विशेष काळजी घेण्यात आली. त्यांच्या सोयीने प्रायव्हेट जेटची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे कॉकपिटमध्ये फोटो काढून ते आपल्या मैत्रिणींच्या ग्रुपमध्ये शेअर करण्यासाठी रेबेकाच्या आईमध्ये मोठी उत्सुकता दिसून आली.

रेबेकाच्या कुटुंबाची ही आलिशान जीवनशैली पाहून 'सोशल मीडिया' यूजर्सही आश्चर्यचकित झाले आहेत. काहींनी अशाच प्रकारचे जीवन जगण्याचे स्वप्न असल्याचे म्हटले, तर काहींनी या व्हिडीओवर मजेशीर प्रतिक्रिया दिल्या. सोशल मीडियावर सध्या 'रिच टॉक' या ट्रेंडची मोठी चर्चा असून, अतिशय श्रीमंत लोकांच्या आलिशान जीवनशैलीशी संबंधित व्हिडिओ त्यात मोठ्या प्रमाणात पाहिले जातात. रेबेका मा या सिलिकॉन व्हॅलीतील टेक उद्योजक सायमन मा आणि हेइडी चौ यांच्या कन्या आहेत. रेबेकाने हायस्कूलमध्ये असतानाच स्वतःची कंपनी सुरू केली होती. त्यानंतर त्यांनी 'यूएससी'च्या मार्शल स्कूल ऑफ बिझनेसमध्ये शिक्षण घेतले.

## 'दंगल', केवळ महिलांसाठी

लखनऊमध्ये आजही एक अनोखी परंपरा जपली जात आहे. नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी येथे महिलांसाठी विशेष कुस्तीचा आखाडा भरतो. या आखाड्यात केवळ महिलाच सहभागी होतात. एवढेच नव्हे, तर प्रेक्षक म्हणूनही पुरुषांना प्रवेश दिला जात नाही. स्थानिक भाषेत या अनोख्या आयोजनाला 'हापा' असे म्हटले जाते.

लखनऊच्या अहमामऊ गावात दरवर्षी नागपंचमीच्या दुसऱ्या दिवशी हा पारंपरिक कार्यक्रम आयोजित केला जातो. सकाळपासून गावातील महिला एकत्र येतात. देवी-देवतांची पूजा-अर्चा केली जाते आणि पारंपरिक गीते गायली जातात. धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर गावातील आखाडा महिलांच्या उत्साहाने आणि जल्लोषाने गजबजून जातो. 'हापा'ची सुरुवात कोणत्याही औपचारिक घोषणेने होत नाही. महिला एकमेकींना कुस्तीचे आव्हान देतात आणि त्यानंतर आखाड्यात उतरून



ताकद व चपळाईचे प्रदर्शन करतात. कुस्तीमध्ये विविध डावपेचांचा वापर केला जातो. आखाड्याभोवती बसलेल्या महिला टाळ्या वाजवत आणि घोषणा देत सहभागी महिलांचा उत्साह वाढवतात. या आयोजनात महिलांचा मोठ्या प्रमणावर सहभाग असतो.

या आयोजनाचे सर्वांत वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे येथे पुरुषांना पूर्णपणे प्रवेशबंदी असते. केवळ लहान मुलांना महिलांसोबत येण्याची परवानगी असते. स्थानिक परंपरेनुसार कार्यक्रमाच्या ठिकाणीच नव्हे, तर आजूबाजूलाही पुरुषांची उपस्थिती टाळली जाते. एखाद्या पुरुषाने घराच्या छतावरून हा कार्यक्रम पाहण्याचा प्रयत्न केला तरी त्याला तेथून हटण्यास सांगितले जाते. स्थानिक नागरिकांच्या मते, अहमामऊमधील ही परंपरा नवीन नसून तिची मुळे नवाबांच्या काळापर्यंत जातात. त्या काळात नवाबी कुटुंबातील महिला येथे येऊन वेळ घालवत असत. नृत्य, संगीत, पारंपरिक कार्यक्रम आणि महिलांमधील मेलमिलाप हा या आयोजनाचा भाग होता. कालांतराने या परंपरेमध्ये बदल होत गेले आणि गेल्या काही वर्षांत महिलांच्या कुस्तीने या आयोजनाला नवी ओळख मिळाली. 'हापा' हा केवळ कुस्तीचा कार्यक्रम नसून महिलांचा सहभाग, आत्मविश्वास आणि सामाजिक एकजुटीचे प्रतीक मानला जातो. गावातील महिला आजही मोठ्या उत्साहाने ही परंपरा पुढे नेत आहेत. नव्या पिढीतील महिलांनाही या आयोजनाशी जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. कुस्तीच्या सामन्यांच्या शेवटी विजेत्या महिलांचा पारंपरिक पद्धतीने सन्मान केला जातो.



## शोध बंदुकीचा, मिळाली रोकड!

मध्य प्रदेशातील सागर जिल्ह्यातील गोपालगंज पोलिस ठाण्याच्या हद्दीत, बंदूक असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी एका घरावर छापा टाकला. या छाप्यानंतर पोलीसांना कोणतेही शस्त्र सापडले नाही; परंतु त्यांना घरातून मोठ्या प्रमाणात रोकड सापडली. ही रक्कम इतकी मोठी होती, की पोलिसांना नोटा मोजण्याचे मशीन मागवावे लागले. ही घटना टिली तिगड्डा जवळील एका घरात घडली. 'सोशल मीडिया'वर एका तरुणाचा बंदूक हातात घेतलेला फोटो पोलिसांना मिळाला होता. या माहितीच्या आधारे, गोपालगंज पोलिसांनी जगदीश अहिरवार यांचा मुलगा सौरभ याच्या घरावर छापा टाकला. पोलिसांनी घराची झडती घेतली. त्यांना कोणतेही शस्त्र सापडले नाही; परंतु त्यांना घरातून मोठ्या प्रमाणात रोकड सापडली. प्राथमिक माहितीनुसार, ही रोकड अंदाजे एक कोटी रुपये आहे. रोकड सापडल्यानंतर पोलिसांनी घरात उपस्थित असलेल्या कुटुंबीयांची चौकशी केली. कुटुंबीयांनी दावा केला, की हे पैसे भोपाळमधील एका इंजिनीअर नातेवाइकाचे आहेत; मात्र एवढी मोठी रक्कम घरात का ठेवली होती, हा प्रश्न अनुत्तरित आहे. पोलिसांनी आता या पैशांच्या खऱ्या स्रोताचा तपास सुरू केला आहे.पोलिसांसोबत महसूल विभागाच्या पथकालाही घटनास्थळी बोलावण्यात आले होते. रोकड मोजण्यासाठी नोटा मोजण्याचे मशीन आणण्यात आले. या प्रकरणाची माहिती प्राप्तिकर विभागालाही देण्यात आली. हे पैसे कोणाचे आहेत आणि ते कुठून आले, याचा तपास सुरू आहे.



## बुड्ढी के 'सफेद' बाल

अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे हे गेल्या काही काळापासून बनावट आणि भेसळयुक्त पदार्थांविरोधात कठोर कारवाई करत आहेत. आतापर्यंत मुंढे यांच्या टीमने अनेक ठिकाणी बनावट पदार्थांचा साठा जप्त केला आहे. तसेच काही पदार्थांवर बंदीही घातली आहे. अशातच आता मुंढे 'सोशल मीडिया'वर एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आले आहेत. 'बुड्ढी के बाल' अर्थात कॉटन कँडीशी संबंधित एक फोटो 'सोशल मीडिया'वर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, त्यावर नेटकऱ्यांकडून भन्नाट प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. मुंढे यांच्या कारवाईच्या भीतीमुळे 'बुड्ढी के बाल'चा गुलाबी रंगच गायब झाला, असा मिश्कील दावा व्हायरल फोटोसोबत केला जात आहे. यापूर्वी गुलाबी रंगात दिसणारे 'बुड्ढी के बाल' आता पांढऱ्या रंगात दिसत असल्याचे या फोटोमध्ये दाखवण्यात आले आहे. यावर एकाने कमेंट करत म्हटले, की आता खरंच 'बुढिया के बाल' लग रहे हैं, पहले गुडिया के बाल लग रहे थे. 'बुड्ढी के बाल' तयार करताना आकर्षक गुलाबी रंगासाठी कृत्रिम रंगांचा वापर केला जात असल्याची चर्चा यापूर्वी अनेकदा झाली आहे; मात्र बनावट आणि हानिकारक पदार्थांविरोधात प्रशासनाकडून कारवाईचा बडगा उगारल्यानंतर कृत्रिम रंगाचा वापर टाळला जात असल्याने 'बुड्ढी के बाल'चा नैसर्गिक रंग पांढरा दिसू लागल्याचा दावा सोशल मीडियावर केला जात आहे. मुंढे यांनी बनावट, भेसळयुक्त आणि नियमबाह्य खाद्यपदार्थांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. त्यामुळे त्यांच्या कारवाईचा संदर्भ घेत नेटकऱ्यांनी मुंढे यांच्या कारवाईच्या भीतीमुळे बुड्ढी के बाल पांढरे झाले अशा कमेंट केल्या आहेत.

## फायद्यासाठी सैनिकांशी विवाह!

रशिया-युक्रेन युद्धादरम्यान एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. काही महिला सैनिकांशी केवळ आर्थिक फायद्यासाठी लग्न करत असल्याचा दावा केला जात आहे. युद्धात या सैनिकांचा मृत्यू झाल्यानंतर सरकारकडून मिळणाऱ्या मोठ्या नुकसानभरपाईचा लाभ घेण्यासाठी हे विवाह केले जात असल्याचे आरोप आहेत. 'सोशल मीडिया'वर अशा महिलांना 'ब्लॅक विडोज' असे संबोधले जात आहे.

रिपोर्टस्नुसार, युद्धात मृत्युमुखी पडलेल्या रशियन सैनिकांच्या कुटुंबीयांना सरकारकडून मोठी आर्थिक मदत दिली जाते. या भरपाईची रक्कम लाखो रुबलमध्ये असून भारतीय चलनानुसार ती अनेक लाखांपासून कोट्यवधी रुपयांपर्यंत असू शकते. सैनिकांच्या कुटुंबीयांना आर्थिक सुरक्षा देणे हा या मदतीमागील उद्देश आहे; मात्र या व्यवस्थेचा गैरफायदा घेतला जात असल्याचे आरोप आता होत आहेत. मारिया नावाच्या महिलेने केलेल्या दाव्यामुळे या प्रकरणाची चर्चा सुरू झाली आहे. तिच्या म्हणण्यानुसार, तिच्या वडिलांनी गुपचूप सैन्यात प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांनी आपल्यापेक्षा खूपच कमी वयाच्या एका महिलेशी लग्न केले. लग्नानंतर अवघ्या दोन दिवसांनी त्यांना युद्धक्षेत्रात पाठवण्यात आले. तेथे त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर त्यांच्या नव्या पत्नीला नुकसानभरपाईची रक्कम मिळाली. या संपूर्ण प्रकरणाबाबत सुरुवातीपासूनच संशय असल्याचे मारियाने सांगितले.

रशियामध्ये 'ब्लॅक विडोज' हा शब्द सोशल मीडियावर काही काळापासून चर्चेत आहे. काही महिला आर्थिक फायद्यासाठी एकाकी किंवा अडचणीच्या परिस्थितीत असलेल्या सैनिकांना लक्ष्य करत असल्याचे आरोप केले जातात; मात्र अशा सर्व दाव्यांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. या प्रकरणाला अधिक तोंड फुटले ते एका रिअल इस्टेट एजंटचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर. या व्हिडिओमध्ये ती कथितरीत्या सैनिकाशी लग्न करण्याचा आणि तो युद्धात मारला गेल्यास मिळणाऱ्या नुकसानभरपाईच्या पैशातून घर खरेदी करण्याचा सल्ला देताना दिसत होती. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर 'सोशल मीडिया'वर तीव्र संताप व्यक्त करण्यात आला.

वाढता विरोध लक्षात घेऊन रशियन अधिकाऱ्यांनी संबंधित एजंटविरोधात कारवाई केली. तिला सार्वजनिकपणे माफी मागावी लागली असून कायदेशीर कारवाईलाही सामोरे जावे लागल्याचे सांगितले जात आहे. सैनिकांच्या बलिदानाचा आर्थिक फायद्यासाठी वापर करणे अत्यंत निंदनीय असल्याची प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली.



# ‘डीसीएस एमच’ ॲपद्वारे शेतकऱ्यांना स्वतः पीक नोंदणीची सुविधा

**शेतकरी बांधवांनी आपल्या शेतातील पिकांची अचूक व वेळेत नोंदणी करून घ्यावी : सभापती प्रा. राम शिंदे**

नगर – महाराष्ट्रात पीक नोंदणीची प्रक्रिया अधिक सुलभ, जलद आणि पारदर्शक करण्यासाठी केंद्र शासनाच्या DCS MH मोबाईल ॲपद्वारे शेतकरी स्तरावरून स्वतः पीक नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ११ सप्टेंबर २०२६ पासून ही सुविधा कार्यान्वित करण्यात आली असून, राज्यातील शेतकरी बांधवांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपल्या शेतातील पिकांची नोंदणी वेळेत करून घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले आहे.

केंद्र शासनाच्या डिजिटल क्रॉप सर्व्हेअंतर्गत महाराष्ट्रात पीक नोंदणीची प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी DCS MH मोबाईल ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे. ११ ऑगस्ट २०२६ पासून सहाय्यक स्तरावर पीक नोंदणीची प्रक्रिया सुरू आहे. त्याचबरोबर आता ११ सप्टेंबर २०२६ पासून शेतकऱ्यांना स्वतःच्या मोबाईलवरून पीक नोंदणी करता येणार आहे.

### Farmer ID च्या माध्यमातून नोंदणी

शेतकरी बांधवांनी DCS MH ॲपमध्ये आपला Farmer ID प्रविष्ट करून आपल्या शेतातील पिकांची नोंदणी करता येईल. संबंधित Farmer ID शी संलग्न असलेल्या सर्व शेतजमिनींची पीक नोंदणी या सुविधेद्वारे करता येणार आहे. त्यामुळे पीक नोंदणीसाठी संबंधित यंत्रणेकडे जाण्याची आवश्यकता कमी होऊन शेतकऱ्यांना घरबसल्या आपल्या मोबाईलद्वारे ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

### अचूक पीक नोंदणीचे महत्त्व

पीक नोंदणी ही केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. शेतातील पिकांची अचूक नोंद उपलब्ध असल्यामुळे विविध शासकीय योजना, अनुदाने, पीकविमा, नुकसानभरपाई तसेच विविध शासकीय सेवांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यास मदत होते.

त्यामुळे प्रत्येक शेतकरी बांधवाने आपल्या शेतातील पिकांची अचूक, योग्य आणि वेळेत नोंदणी करावी. पीक नोंदणी करताना आपल्या शेतातील प्रत्यक्ष पिकांचीच माहिती नोंदवावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

### DCS MH ॲप येथे उपलब्ध

शेतकरी बांधवांनी आपल्या मोबाईलमध्ये DCS MH ॲप डाऊनलोड करून Farmer ID च्या माध्यमातून पीक नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.

### DCS MH ॲप डाउनलोड करण्यासाठी

Google Play Store - DCS MH App (https://play.google.com/store/apps/details?id=com.mhdcs.agristackpcampaignid=webšshareutmšsource=chatgpt.com)

अचूक पीक नोंदणी – शासकीय योजनांचा प्रभावी लाभ!

डिजिटल नोंदणी – शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाची नवी दिशा!

या उद्देशाने राज्यातील शेतकरी बांधवांनी DCS MH ॲपचा वापर करून आपल्या शेतातील पिकांची नोंदणी शक्य तितक्या लवकर, शक्य असल्यास आजच करून घ्यावी, असे आवाहन सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले आहे.



## गुरुवाणी – ५९
## तीर्थंकर धर्म...

आकाशातून पडलेला पावसाचा थेंब चातकाच्या तोंडात गेला तर अमृत होते. जंबू स्वामींनी सुधर्मा स्वामींना तीर्थंकर भगवान महावीर यांच्या विषयी विचारले होते. त्यांनी तीर्थंकरांकडून जे ज्ञान मिळाले ते पुढे पोहचवले. ते ’आगम’ बनले. हे केवळ एखाद्या गोष्टीची डिलिव्हरी देण्यासारखे होते. पण तीर्थंकर महावीर यांच्या विषयी बोलणे वेगळे होते. मनुष्य काय बोलतो ते ऐकण्यापेक्षा मनुष्याला ऐकले तर संघर्षच होणार नाही. ’व्यक्ती को सुनना वो भक्ती है’. ’तीर्थंकर महावीरांचे ऐकले’ आणि ’तीर्थंकर महावीरांना ऐकले’, या दोन्हीतील फरक कळला पाहिजे. श्रीकृष्ण जे देऊ शकत होता ते दुर्योधनाने घेतले. पण अर्जुनाने देणाऱ्या श्रीकृष्णालाच घेतले. सुधर्मा स्वामी हे भगवान महावीर जगले, आणि तेच जगणे त्यांना जंबूस्वामींना सांगायचे होते. बुद्धिमान कधी भक्त नाही होत आणि भक्त कधी बुद्धिमान असू शकत नाही. म्हणूनच बुद्धिमानासाठी जे अशक्य असते ते भक्तासाठी सहजशक्य असते. १९८१ चा चातुर्मास संपल्यानंतर गुरूदेव परीक्षा बोर्डवर परतले. चातुर्मासानंतरही त्यांनी नित्य प्रवचन सुरू केले. मोजकेच लोक ते ऐकायला यायचे. तेव्हा मी गुरूदेवांना म्हटलं, इथं लोकच येत नाहीत, कशाला प्रवचन करता? गुरूदेवांनी शांतपणे उत्तर दिले, ’मी परमात्म्याच्या शासनाचा कर्जदार आहे. त्यांची वाणी नाही सांगितली तर ते कर्ज कसे फेडू’. अशी गुरूदेवांची श्रद्धा होती. अशक्य ते शक्य करतो तो भक्त असतो. हे करूनही त्याच्या मनाला अहंकार शिवत नाही. बुद्धिमान जेवढे शक्य आहे तितकेच करून अहंकार बाळगतो. वीरती सुधर्मा स्वामींच्या अनुभूतीतील भगवान महावीर आहेत. सुधर्मा स्वामींच्या मनातील भक्तीचा दिवा प्रज्वलित आहे. आपल्याला सुद्धा आपल्या मनात हा भक्तीचा दिवा प्रज्वलित करायचा आहे. तीच खरी दिवाळी. अर्जुन माली, इंद्रभूती गौतम, राजा श्रेणिक प्रत्येकाला काय पाहिजे हे तीर्थंकरांना माहिती होते. कुठल्या जमिनीत कोणते बीज लावायचे याचे ज्ञान हवे. जगातील सगळे भगवान भक्तांना वरदान आणि त्रास देणाऱ्यांना शाप देतात. पण भगवान महावीर त्रास देणाऱ्यांवरही कृपाच करतात. तीर्थंकर महावीर ’अनंत’ आहेत, एण्डलेस आहेत. जे ज्याला दिसते तसे त्याला मिळते. शेवट पहाल तर शेवटच होईल. अनंत पहाल तर अनंतच होईल. भगवान महावीरांचा धर्म आहे तीर्थंकर धर्म. दुसऱ्याला तीर्थ बनवणे हा त्यांचा धर्म आहे.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# अन्न भेसळीविरोधात कारवाई; २ लाख ६० हजार रुपयांचा साठा जप्त

नगर – अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ तसेच नियम व नियमन, २०११ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने संगमनेर तालुक्यातील मे. व्ही. एस. एकदंत फुड प्रॉडक्ट्स या आस्थापनेवर कारवाई केली. या कारवाईत कमी दर्जाच्या संशयावरून ‘काऊ घी’ या अन्नपदार्थाचा एकूण २ लाख ६० हजार ८२० रुपये किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.

सहायक आयुक्त (अन्न) सो. ह. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी उ. र. सूर्यवंशी यांच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे २१ सप्टेंबर रोजी मे. व्ही. एस. एकदंत फुड प्रॉडक्ट्स, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे अचानक तपासणी केली. यावेळी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत अनुपालन होत नसल्याचे तसेच अन्नपदार्थाच्या दर्जाबाबत संशय आढळून आल्याने ‘काऊ घी (जार)’ व ‘काऊ घी (१५ किलो टिन)’ या अन्नपदार्थांचे नमुने घेऊन संबंधित साठा जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या साठ्यामध्ये काऊ घी (जार) १७६ लिटर (१ लिटरचे १७६ जार), किंमत १ लाख ३५ हजार ५२० रुपये, तसेच काऊ घी (१५ किलो टिन) १७९ किलो (१५ किलोचे १२ टिन), किंमत १ लाख २५ हजार ३०० रुपये, असा एकूण २ लाख ६० हजार ८२० रुपये किंमतीचा साठा आहे.

जप्त साठ्यातून घेण्यात आलेले नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून त्यांचे अहवाल प्रलंबित आहेत. विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास अन्न सुरक्षा अधिकारी उ. र. सूर्यवंशी हे सहायक आयुक्त (अन्न) सो. ह. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

दरम्यान, आष्टी, जि. बीड येथील दूध भेसळ प्रकरणात सहभाग आढळून आल्याने मे. भगवान कृपा दूध संकलन व शीतकरण केंद्र, मु. पो. खर्डा, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर (मालक हरिदास एकनाथ गोपाळघरे) या आस्थापनेचा परवाना निलंबित करण्यात आला आहे.

### सणासुदीच्या काळात दक्षता बाळगण्याचे आवाहन

सणासुदीच्या काळात अहिल्यानगर जिल्ह्यातील स्वीटमार्ट तसेच इतर खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या व्यावसायिकांनी कमी दर्जाचे अथवा अस्वच्छ ठिकाणी तयार केलेले अन्नपदार्थ तयार करणे, साठवणे किंवा विक्री करणे टाळावे. तसेच बाहेरील राज्यांतून कमी दर्जाचे अन्नपदार्थ ट्रॅव्हल्स अथवा इतर वाहनांमधून अस्वच्छ पद्धतीने वाहतूक करून जिल्ह्यात आणू नयेत. अशा प्रकारचे प्रकार आढळून आल्यास संबंधित ट्रॅव्हल्स एजन्सीविरुद्धही नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

अहिल्यानगर जिल्ह्यात अन्नपदार्थांच्या भेसळीबाबत संशय अथवा तक्रार असल्यास नागरिकांनी अन्न व औषध प्रशासन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त (अन्न), परिमंडळ–२, सो. ह. इंगळे यांनी केले आहे.

## विवाहितेचा विनयभंग करत जीवे मारण्याची धमकी

नगर – केडगाव परिसरातील शाहूनगर, खाटीकमळा येथे एका महिलेचा वारंवार पाठलाग करून विनयभंग करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील पीडित महिला ४९ वर्षांच्या असून त्या केडगाव परिसरामध्ये राहतात. आरोपी संकेत बंडू पवार (रा. केडगाव) याने १७ ते २० सप्टेंबर दरम्यान फिर्यादी महिलेच्या मोबाईलवर सातत्याने फोन करून आणि मेसेज पाठवून त्रास दिला. आरोपीने वारंवार फोन, मिस कॉल आणि मेसेजच्या माध्यमातून महिलेचा छुपा पाठलाग केला.

यादरम्यान आरोपीने महिलेसोबत अयोग्य वर्तन करून तिचा विनयभंग केला. तसेच, तुला व तुझ्या मुलीकडे बघतोच, अशी धमकी देत जीवे मारण्याची भाषा वापरली आणि अश्लील भाषेत शिवीगाळ केली. या प्रकारामुळे त्रस्त झालेल्या महिलेने दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता २०२३ च्या कलम ७९, २९६, ३५२ आणि ३५१ (२) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीच्या रेल्वे स्टेशनवर आवळल्या मुसक्या

नगर – नगर तालुक्यातील पिंपळगाव कौडा येथे लोखंडी कत्तीने वार करत तरुणाचा खुन करून पसार झालेल्या आरोपीला कल्याण रेल्वे स्टेशन परिसरातून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. हरीष गुलाब काळे (वय ३०, रा. पिंपळगाव कौडा, ता. नगर) असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे.



या गुन्ह्याची हकीगत अशी की, १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास फिर्यादी विक्रम रोहिदास भोसले (वय ४०, रा. पिंपळगाव कौडा, ता. नगर) यांचे नातेवाईक हरीष गुलाब काळे याच्या राहत्या घरी भांडण सुरू होते. हे भांडण सोडवण्यासाठी फिर्यादी व त्यांचा भाऊ किरण रोहिदास भोसले हे गेले होते. त्यावेळी हरीष गुलाब काळे याने भांडण सोडवण्याच्या कारणावरून किरण रोहिदास भोसले याच्या तोंडावर, छातीवर व पोटावर लोखंडी कत्तीने वार करून खून केला व तो पसार झाला होता. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), ३५२, ३५१(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्ह्याची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेस तपासाचे व आरोपीचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी पोलीस अंमलदार फुरकान शेख, शामसुंदर जाधव, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, रोहित मिसाळ, प्रताप देवकाते, दिपक जाधव व अरूण मोरे अशांचे पथक तयार करून गुन्हयातील आरोपीचा शोध घेणेबाबत सुचना व मार्गदर्शन करून पथकास रवाना केले.

गुन्हा घडल्या पासून फरार असलेला आरोपी श्रीगोंदा, दौंड, पुणे व मुंबई परिसरात सतत आपले ठिकाण बदलत होता. दरम्यान, २३ सप्टेंबर रोजी आरोपी हरीष गुलाब काळे हा कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात असल्याची गोपनीय माहिती पथकास मिळाली. या माहितीच्या आधारे पथकाने कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचून हरीष काळे ताब्यात घेतले. ताब्यातील आरोपीस पुढील तपासासाठी नगर तालुका पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

# पोलवर आकडा टाकून वीज चोरी

नगर – भिंगार जवळील गणेश नगर, बाराबाभळी येथे घराजवळील एल. टी. पोलवर आकडा टाकून वीज चोरी करणाऱ्यावर महावितरणच्या पथकाने कारवाई केली आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा २००३ चे कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेश नगर, बाराबाभळी येथे आरोपीने त्याच्या घराजवळील एल. टी. पोलवरून काळ्या रंगाची वायर वापरून अनाधिकृत वीज पुरवठा घेऊन महावितरण कंपनीची २०५२ युनिट्सची वीज चोरी केली आहे. चोरी केलेल्या वीजेची किंमत ४१ हजार ८९९ रुपये आणि कलम १५२ प्रमाणे तडजोडीची रक्कम २ हजार रुपये अशी एकूण ४३ हजार ८९९ रुपये इतक्या रकमेची वीज चोरी करण्यात आली असल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी महावितरणच्या निंबोडी शाखा कार्यालयाचे कनिष्ठ अभियंता सागर बाळासाहेब बेंडकुळे (वय २९) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिवनाथ भाऊसाहेब लवांडे (रा. गणेशनगर, बाराबाभळी, ता. नगर) या आरोपीविरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस नाईक सायंबर करत आहेत.

## चाणक्य चौक परिसरातून दुचाकीची चोरी; गुन्हा दाखल

नगर – नगर शहरातील चाणक्य चौक येथील शिव हॉस्पिटलसमोरून हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल (क्र. एमएच १६ एए ६०४०) अज्ञात चोरट्याने लांबवल्याची घटना २१ सप्टेंबर रोजी दुपारी घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. याबाबत राहुल जनार्दन पंचमुख (वय ४०, रा. जिल्हा परिषद शाळेजवळ, बाबुर्डी घुमट, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे पत्नीला घेवून शिव हॉस्पिटलमध्ये गेले होते. त्यांनी हॉस्पिटलसमोर मोटरसायकल व्यवस्थित हँडल लॉक करून पार्क केली आणि उपचारासाठी आत गेले. नंतर दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास तपासणी करून बाहेर आले असता त्यांना त्यांची मोटरसायकल तिथे दिसून आली नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची खात्री पटल्यानंतर त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात जाऊन फिर्याद दिली आहे.

# काम न करता निधी लाटणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करण्यात यावी

नगर – तालुक्यातील भातोडी येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटक वस्ती विकास योजनेअंतर्गत मंजूर झालेले काम न करताच बनावट बिल उचलून भ्रष्टाचार करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पापामियाँ अहमद पटेल यांनी प्रशासनाकडे केली आहे.

सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात भातोडी ग्रामपंचायत हद्दीतील ’रमाई आंबेडकरनगर’ येथील दलित वस्तीत पेव्हिंग ब्लॉक बसवण्याचे काम मंजूर झाले होते. मात्र, प्रत्यक्ष जागेवर कसलेही पेव्हिंग ब्लॉक बसवण्याचे काम झाले नसतानाही, संबंधित ग्रामसेवक आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी संगनमत करून या कामाचे बिल उचलल्याचा आरोप पापा मियाँ पटेल यांनी अर्जात केला आहे.

या प्रकरणी पटेल यांनी ४ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवली होती. या तक्रार अर्जाची दखल घेत जिल्हा समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे यांनी गट विकास अधिकारी (पंचायत समिती, अहिल्यानगर) यांना पत्र पाठवून चौकशीचे आदेश दिले आहेत. नियमानुसार त्वरित चौकशी करून केलेल्या कारवाईचा अहवाल कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

प्रत्यक्षात काम न करता निधी लाटणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भातोडी ग्रामस्थांमधून होत आहे. तसेच चौकशीचे आदेश देऊन अनेक दिवस उलटूनही चौकशी अहवाल येत नसल्याने लवकरात लवकर चौकशी ते आदेश देण्यात यावे अशी देखील मागणी पापामियाँ पटेल यांनी केले आहे.

# पतसंस्थांच्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण ही संस्थेची गुंतवणूक आहे

**काका कोयटे यांचे प्रतिपाद; नगर तालुका व शहर पतसंस्थांसाठी कार्यशाळा; संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती**

नगर – पतसंस्थांच्या संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण ही काळाची गरज आहे. प्रशिक्षणावर खर्च का करायचा, असा प्रश्न अनेक पतसंस्थांना पडतो. परंतु प्रशिक्षण हा खर्च नसून ती पतसंस्थांची गुंतवणूक आहे. संचालकांना वाटते की आम्ही संचालक झालो म्हणजे बँकेचे तज्ञ झालो, परंतु खरी गरज संचालकांना प्रशिक्षण देण्याची आहे. नेपाळ येथील पतसंस्थांनी असा नियम केला आहे की, संचालकांना तीन दिवसीय प्रशिक्षण घ्यावे लागते आणि त्यानंतर परीक्षा घेतली जाते, त्यानंतरच त्यांचा अर्ज वैध ठरवला जातो. सहकार खात्याची अनेक परिपत्रके निघतात, मात्र संचालक मंडळ त्याकडे दुर्लक्ष करते. या कार्यक्रमात शहर व तालुक्यातील १५ पतसंस्थांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. चांगले काम करणाऱ्या पतसंस्थांना शाबासकीची थाप देणे आवश्यक आहे. पतसंस्था चळवळीला बळ देण्यासाठी महाराष्ट्र राज्य फेडरेशन व नाशिक विभागीय फेडरेशनचे सभासद व्हावे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांनी केले.

अहिल्यानगर येथील सारसनगर येथील एडीसीसी बँक हॉल, चास (चाहुराणा बुद्रुक शाखा), जि. अहिल्यानगर येथे नाशिक विभागीय नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन लि. अहिल्यानगर, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन व अहिल्यानगर जिल्हा व तालुका पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच जिल्हा उपनिबंधक व नगर तालुका उपनिबंधक कार्यालय, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने नगर तालुका व शहरातील पतसंस्थांचे संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी आयोजित एक दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये काका कोयटे, नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा, सेवानिवृत्त सहकार आयुक्त शैलेश कोतमिरे, सेवानिवृत्त सहनिबंधक तानाजी कवडे, संवाद कौशल्य व व्यक्तिमत्व विकास तज्ञ अनिरुद्ध देवचक्के, राजीव गांधी पतसंस्थेचे अध्यक्ष उद्धव दुसुंगे, नगर तालुका फेडरेशनचे सुनील लोटके, रामकृष्ण पतसंस्थेचे विश्वनाथ कासट, लक्ष्मीकांत झंवर, अनुरीता झगडे, मराठा पतसंस्थेचे व्हा.चेअरमन उदय अनभुले, ज्ञानदेव पांडुळे, बाळकृष्ण काळे, मुख्य प्रवर्तक लक्ष्मण सोनाळे, जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमन अभय पितळे, व्हा. चेअरमन गांधी, संतोष गांधी, पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे व्यवस्थापक निलेश लाटे, वसुली अधिकारी उमेश मेरगु, संताजी नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन हरिभाऊ डोळसे, जिल्हा फेडरेशनचे वसुली अधिकारी मुबारक शेख, तालुका फेडरेशनचे वसुली अधिकारी निलेश दळवी, नाशिक विभागीय फेडरेशनचे व्यवस्थापक महेश जाधव आदी उपस्थित होते.



पतसंस्थांचे संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी आयोजित एक दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे म्हणाले, २००८ साली ४६९ पतसंस्था अडचणीत आल्या होत्या. त्यावेळी शेजारील पतसंस्था अडचणीत आल्याने ठेवीदारांनी ठेवी काढून घेतल्या. पतसंस्था व्यवसाय करताना ठेवीदारांनी ठेवलेल्या रकमेतून कर्ज स्वरूपात रक्कम वाटप करते. पतसंस्था अडचणीत आल्यास कर्जदार कर्ज थकवतो किंवा त्याची परतफेड करण्याची ऐपत नसते. अशा प्रकारे पतसंस्था चालवण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. पतसंस्थेचे व्यवस्थापक व संचालक मंडळ यांनी घेतलेल्या निर्णयांचा परिणाम पतसंस्थेवर होऊ शकतो. पतसंस्थेचे कर्मचारी प्रशिक्षित आहेत का, त्यांना अकाउंटचे पुरेसे ज्ञान आहे का, हे पाहून प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. ज्या वेळी प्रशिक्षणाचे आयोजन केले जाईल, ती संधी समजून प्रशिक्षण घ्यावे. प्रशिक्षणामुळे ज्ञानात भर पडते. सहकार क्षेत्रातील कायद्यातील बदल, शासन निर्णय, वेगवेगळी परिपत्रके यांचे वाचन करावे. कर्ज वाटप करताना परतफेडीची वृत्ती असणाऱ्यांनाच कर्ज द्यावे. वेगवेगळ्या पतसंस्थांच्या विचारांच्या आदान–प्रदानामुळे पतसंस्थेचा एनपीए कसा कमी करता येईल, याची माहिती घेऊन एनपीए कमी करण्यासाठी प्रयत्न करावेत.

वसंत लोढा म्हणाले, जिल्हा बँकेत पतसंस्थांच्या तीस टक्के ठेवी आहेत. सर्व पतसंस्थांनी पुढाकार घेऊन जिल्हा बँकेच्या धुरिणांना पतसंस्था चळवळीला वेळ देणारा व पतसंस्थांचे प्रश्न सोडवणारा प्रतिनिधी जिल्हा बँकेत असावा, हे सांगावे. पतसंस्था सर्वसामान्यांना आधार देतात. बेकायदेशीर सावकारी जर कोणी बंद केली असेल, तर त्याचे श्रेय पतसंस्थांना जाते. जर पतसंस्था तोट्यात आली तर संचालकांना जबाबदार धरले जाते. ज्यावेळी पतसंस्था नफ्यात येते, त्यावेळी त्यातील काही प्रमाणात नफा संचालकांना वाटावा, हा विचार सहकार कायद्याने करणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील काही तालुक्यातील पतसंस्था वेगवेगळ्या माध्यमातून अडचणीत आल्या होत्या, काही पतसंस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी चुकीचे काम केल्याने आज ते तुरुंगात आहेत. नगर जिल्हा हा महाराष्ट्राला सहकार क्षेत्रात दिशा देणारा जिल्हा आहे, परंतु अशा काही घटना घडू लागल्यामुळे सक्षमपणे चांगल्या प्रकारे काम करणाऱ्या पतसंस्थांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षण दिले पाहिजे. या दृष्टिकोनातून संगमनेर, पारनेर, जामखेड, पाथर्डी, राहाता तालुक्यातील पतसंस्थांसाठी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आल्या. जिल्ह्यात पतसंस्थांची चळवळ मोठ्या प्रमाणात रुजली आहे. गेल्या २५–३० वर्षांपासून नगर तालुक्यातील पतसंस्था चांगल्या पद्धतीने सक्षमपणे काम करीत आहेत. त्यापैकी १५ पतसंस्थांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. नगर शहरात ४० पतसंस्था आहेत, राजीव गांधी नागरी सहकारी पतसंस्थेच्या तीनशे कोटींच्या ठेवी आहेत, तसेच जामखेडच्या एच. यु. गुगळे पतसंस्थेत फक्त आठ कर्मचारी कार्यरत असून पावणे दोनशे कोटींच्या ठेवी आहेत, तसेच संगमनेरच्या संग्राम पतसंस्थेची १० कोटी रुपयांची वास्तू दिमाखात उभी आहे.

उद्धवराव दुसुंगे म्हणाले, जिल्हा बँकेत जिल्ह्यातील पतसंस्थांचे हजारो कोटी रुपये आहेत. जिल्हा बँकेत पतसंस्थांचा एक प्रतिनिधी संचालक म्हणून असावा, यासाठी सहकार खात्याने स्वतंत्र मतदारसंघ निर्माण करावा. या प्रशिक्षण वर्गासाठी आलेल्या सर्वांचे मी स्वागत करतो. महाराष्ट्रात सहकार मोठ्या प्रमाणात आहे. भविष्यकाळात पतसंस्थांना अडचणी निर्माण होऊ नयेत, म्हणून नाशिक विभागीय फेडरेशनने प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले आहे. कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण होणे हे महत्त्वाचे आहे.

पतसंस्था व कायदे या विषयावर सेवानिवृत्त सहकार आयुक्त शैलेश कोतमिरे यांनी माहिती दिली. संवाद कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास याविषयी अनिरुद्ध देवचक्के यांनी मार्गदर्शन केले.

सेवानिवृत्त सहनिबंधक तानाजी कवडे यांनी नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था आर्थिक मापदंड व सुधारित गुणपत्रिका, तसेच पतसंस्थांसाठी एनपीए तरतुदी, एनपीए मॅनेजमेंट व संचालक मंडळाचे अधिकार व कर्तव्ये या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमर एस. एस. यांनी केले. सुनील लोटके यांनी आभार मानले.

**पुरस्कार प्राप्त संस्था :** पतसंस्थांच्या एक दिवसीय कार्यशाळेत सक्षमपणे कार्य करणाऱ्या १५ पतसंस्थांचा व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या तीन व्यवस्थापकांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. पुरस्कार प्राप्त पतसंस्थांची नावे पुढीलप्रमाणे – रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटी लि., धनसंपदा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था (एमआयडीसी), भैरवनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था (केडगाव), अ. नगर जिल्हा मराठा नागरी सहकारी पतसंस्था, याज्ञवल्क्या नागरी सहकारी पतसंस्था, मार्कंडेय नागरी सहकारी पतसंस्था, लक्ष्मीनारायण नागरी सहकारी पतसंस्था, सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्था, लोकसेवा नागरी सहकारी पतसंस्था, राणी लक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, सद्गुरु ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, निशा अंजली ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, जैन ओसवाल ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, मेहर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, अहिल्यानगर पोस्टल डिव्हिजन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी.

तसेच उत्कृष्ट व्यवस्थापक– रामकृष्ण अर्बनचे शशिकांत पुंडलिक, राजीव गांधी नागरी पतसंस्थेचे शंकरराव भोगाडे, पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे निलेश लाटे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

